# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १३/०६/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १३/०६/२००५ रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. ०९/०६/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ९) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १०) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ११) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १२) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**रजेचा अर्ज आलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब सभा सुरु होण्यापुर्वी मी एकदा तुम्हाला विषय सांगितला होता. आपण बोलला होता की, ह्या सभेत तो विषय घेईन. पण तो विषय घेतला नाही, पुढच्या सभेत तरी तो विषय घ्या. मला त्याची पोच द्या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, इतिवृत्तांताच्या बाबतीत आपण दोन-दोन, तीन-तीन महिन्याचे इतिवृत्तांत एकेका सभेला आणायाला लागलो. त्यावेळी मध्यंतरी आपली दोन चार सभा होऊन गेलेल्या असतात आणि ह्याची आपल्याला आठवण राहत नाही. आपण काय बोललो, काय नाही.

**गजानन भोईर :-**

एक सभा सोडुन दुसऱ्या सभेत आपण आम्हाला इतिवृत्तांत द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपले असे ठरले होते, तरीही असे का होते?

**मा. सभापती :-**

कामकाजामुळे वेळ लागतो.

**गजानन भोईर :-**

चार-चार महिन्याचे एकदा येते म्हणजे काय? एक महिन्याचे सभेच असे घ्या. ह्यात सचिव साहेबांना काय अडचण आहे का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

दोन महिन्यामध्ये आपल्या आठ सभा होतात आणि आम्ही काय बोलतो त्याची आम्हाला आठवण राहत नाही.

**गजानन भोईर :-**

एक सभेचा गॅप टाकुन द्या.

**मा. सभापती :-**

दोन सभेचा गॅप इतिवृत्तांत द्या.

**प्र. सचिव :-**

दोन सभेच्या गॅपने इतिवृत्तांत देऊ.

**प्रभात पाटील :-**

दि. ९/३/०५ रोजीच्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. १५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या सगळ्या शाळा आहेत तिथे पाठ असे पाहिजे.

**केशव घरत :-**

ह्याच पानावर शेवटच्या लाईनवर शिक्षण फार कमी पडतात तर शिक्षक असा शब्द पाहिजे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रभात मॅडम ह्यांनी शिक्षणाबद्दल सांगितले मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाची पुर्तता पुर्ण झालेली आहे. पुढच्या सभेत जवळजवळ ते होणारच आहे. जसे आता तुम्ही शिक्षणाच्या पाठ विषयी बोललात तर अशी तरतुद आहे की, माध्यमिक शिक्षण सुरु करणे. लोकांचे जनरल असे म्हणणे आहे की, आपण जर प्राथमिक शिक्षणामध्ये प्रोग्रेसिव्ह नाही तर तुम्ही सेकन्डरी शिक्षण कसे चालू ठेवू शकता? पंरतु, ह्याच्यामध्ये असा महत्त्वाचा विषय आहे की, पुर्व प्राथमिक आणि माध्यामिक हे शिक्षण समिती मार्फत सुरु होऊ शकते. तर ठाणे महानगरपालिका आणि इतर काही महानगरपालिकेमध्ये असे आहे की, ज्युनिअर के. जी. आणि सिनिअर के. जी. जे की आहेत ते की जर आपण शिक्षण समिती मार्फत सुरु करु शकतो. त्याच्यामुळे आपला जो मुलभुत पाया आहे, हा मजबुत होऊ शकतो आणि जर आपल्याला सेकन्डरी शिक्षणाच्या कामाबद्दल स्वतःला जर समाधान असेल तर प्रायोगिक तत्वावर शाळा सुरु करु शकलो नॅचरल ग्रोथने. आता तो विषय निघून गेलेला आहे. परंतु जर आपण शिक्षण समिती स्थापन केली, ह्या गोष्टीची पुर्तता करण्याकरीता, तर आपल्याला अशा गोष्टी करता येतील की जेणे पुर्वप्राथमिक शाळा कशी सुरु करायची त्याची काय व्यवस्था आहे किंवा माध्यामिक शैक्षणिक विभाग सुरु करायचा आहे, तर तो कसा सुरु करायचा आहे. तर प्रायोगिक तत्त्वावर सुरु करु शकतो. म्हणजे जनरल सातवी पर्यंत शाळा आहे. तर आठवी, नववी आणि दहावी तीन वर्षाने चालु होईल. जर दहावीपर्यंत आपण एकाच शाळेमध्ये गेलो, भाईंदर पुर्व आणि भाईंदर पश्चिम हे किंवा मिरा रोड ह्या तीन ठिकाणी लोकांना आवश्यक अशी बाब आहे आणि ह्या तिन्ही ठिकाणी शाळा मोठ्या प्रमाणात आहेत, प्राथमिक शाळासुद्धा. जर त्याच्यावर आपण विचार केला, शिक्षण समिती स्थापन करुन तर प्रथमदर्शनी असे निर्माण होते की, शिक्षण समिती पुर्णपणे स्थापन न झाल्याने तो विषय आपल्याकडे आणु शकत नाही. म्हणुन शिक्षण मंडळाचा विषय हा पुढच्या मा. महासभेपर्यंत येणार आणि तद्‌नंतर हा विषय घेतला पुर्वप्राथमिक आणि माध्यमिक असे आपण सुरु केले. तर आपल्याला जो मुलभुत पाया आहे. तो होऊ शकतो. सध्या बालवाड्या आहेत ते महिला व बालकल्याण समितीच्या अंर्तगत चालतात. जर शिक्षण समितीचा विषय घेतला माध्यामिकचा, शिक्षण समिती स्थापन करणेबाबत विषय घेतला तर त्यावेळेला तो विषय त्यांच्या अख्यतारीमध्ये येतो. हा मुलभुत जो पाया आहे बालशिशुवर्ग व मोठा शिशु वर्ग त्याने पाया मुलभुत होऊ शकतो. अशा प्रकारची ही एक सुचना आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्या सुचनेबाबत पुढाकार घेऊन त्याची तुम्ही अंमलबजावणी लवकरांत लवकर करा. हे शिक्षणाच्या दृष्टीने आपले पुढचे पाऊल ठरु शकते म्हणुन ती समिती गठित करा आणि त्याच्या माध्यमातुन कामकाज चालू करा अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, शिक्षकसुद्धा कमी आहेत. शिक्षकाची भरती व्हायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपण खुप चांगली माहिती दिली. पण मी आज नवघरवरुन आलो. नवघरच्या शाळेमध्ये मुलांना चालत जायला रस्ता नाही. दोनच तास पाऊस पडला आहे तरी तेथुन चालत जायला रस्ता नाही. संपुर्ण तलावासारखे झाले आहे. आज मुले शाळेतही जाणार नाही असे वाटते. आजच्या आज तिथे कोणाला तरी पाठवुन तिथले पाणी काढुन घ्या. जेणेकरुन मुलांना शाळेत जाता येईल.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, ९.३.०५ च्या इतिवृत्तांत पहिल्या पानावर दुरुस्ती आहे. महानगरपालिकेच्या कामकाजाबद्दल रजेवर आहे असे लिहिले आहे तर तिथे धरणेवर असे पाहिजे.

**मा. सभापती :-**

सन्मा सदस्य गजानन भोईर, शाळेच्या ज्या मुलभुत गरजा त्या पुर्ण करण्याच्या बाबतीत आपण चर्चा केली. परंतु नवघर येथे प्राथमिक शाळेत मुलांना शाळेत जायला रस्ता नाही म्हणुन तिथे ताबडतोब आरोग्य विभागाचे कर्मचारी वर्ग पाठवुन देऊन. त्या ठिकाणी मैदानाचा वापर होत असल्याने करु शकत नाही. म्हणुन तिथे जर भरणी करु शकतो तर ताबडतोब भरणी करुन घ्यावी.

**गजानन भोईर :-**

पाणी काढायला आज कोणीतरी माणसे पाठवा. जेणेकरुन प्राथमिक शाळेतील मुलांना चालत जायला रस्ता होईल. संपुर्ण मैदानामध्ये एक फुट एवढे पाणी आहे.

**मा. सभापती :-**

सध्या पाणी काढुन घ्या. नंतर तिथे भराव करा.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, येथे कुदरे किंवा बांधकाम विभागाचे कोणी असेल तर मला माहिती नाही. पण पादपाथ तिथे तयार करायला लावले आहे. जेणेकरुन मॉर्निंग वॉकलाही त्याचा फायदा होईल, संपुर्ण ग्राऊण्डच्या हिशोबाने आणि विद्यार्थ्यांना जाण्याची सोय होईल. मेजरमेन्ट वगैरे सर्व घेतले आहे. पण पुढे कुठे काम थांबले ते मला कळत नाही.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, वेळ असेल तर सभा संपल्यांनतर दहा मिनिटासाठी आपण जाऊन येऊ.

**मा. सभापती :-**

सभेनंतर तिथे आपण जाऊ या.

**अनंत पाटील :-**

सभापती साहेब, शाळेच्या बाबतीमध्ये राई मैदानाच्या येथुन गटार जाते. गटारावर स्लॅब टाकलेला आहे आणि तो संपुर्ण कोसळलेला आहे आणि ते कोसळल्यामुळे प्राथमिक शाळेचे विद्यार्थी आणि आदर्श हायस्कुलचे विद्यार्थी तेथुन जातात. पावसाळ्यामध्ये ग्राऊण्डमध्ये चिखल असतो म्हणुन त्या स्लॅबच्या रस्त्यावरुन लोक जातात. त्या तिथे पाहणी करुन तातडीने स्लॅब टाकता येईल.

**मा. सभापती :-**

पाहणी करुन ते काम करुन घेऊ या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पालीची जी प्राथमिक शाळा आहे ती एकदम अशी खाली गेलेली आहे. त्या शाळेत पाणी भरते त्यामुळे विद्यार्थी शाळेत बसु शकत नाही. जर ती वर घेतली तर विद्यार्थ्यांना बसायला होईल.

**मा. सभापती :-**

जेवढ्या प्राथमिक शाळा आहेत, त्या शाळेच्या मैदानामध्ये प्रथम पावसाची वृष्टी सुरु झाली. त्याच्या अगोदर काही लोकांना झळ पोहचलेली आहे. सर्व अधिकाऱ्यांना विशेष करुन बांधकाम विभाग आणि आरोग्य विभागाला निर्देश देतो की, आपण प्रत्यक्ष त्याठिकाणी जाऊन, त्याठिकाणचे पाणी काढुन घेऊन, भराव करुन जो पादचारी रस्ता बनवता येईल ते त्वरीत काम करुन घ्यावे असे मी याठिकाणी सर्वांना निर्देश देत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, मी मैदानाविषयी बोलत नाही. शाळेबद्दल बोलत आहे.

**मा. सभापती :-**

शाळेबद्दलच बोलत आहेत.

**प्रभात पाटील :-**

दि. २३.०३.०५ रोजीच्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. ३ मध्ये माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. सभापती महोदय, आपल्याला प्रश्न होता की, स्थायी समितीचे क्षेत्र फक्त आर्थिक मंजुरी देण्याइतपत

मर्यादित आहे, येथे दिले होते सन्मा. सदस्या रिटा शाह धरण्यावर बसल्या होत्या म्हणून मी त्याचा खुलासा द्यावा असा आपण आदेश दिला होता. मला अजुन खुलासा मिळाला नाही. लेखीपण नाही आणि तोंडीही नाही.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, २३.३.०५ च्या सभेत मी प्रश्न विचारल्यावर आपण मला उत्तर दिले होते की, पुढच्या सभेत आपल्या प्रश्नाचे उत्तर देऊ. पण उत्तर मला अजुनही मिळालेले नाही. दौरा झाला. आपण तिथे जाऊन आलो पण तरीही अजुन मला उत्तर मिळाले नाही. कृपया त्याची लवकरांत लवकर पुर्तता करावी.

**प्रभात पाटील :-**

आपले अधिकार काय आहे ते सांगा. स्थायी समितीमध्ये आम्हाला दहा महिने होत आहे.

**मा. सभापती :-**

स्थायी समितीचे सभागृह आहे आणि मा. महासभेचे सभागृह आहे. ह्या सभागृहामध्ये आपण ह्यावेळेला सर्वांच्या सहकार्याने पन्नास लाखाचे आर्थिक प्रशासकीय मंजुरीची पॉवर आपल्याला मा. महासभेने दिलेली आहे. जे विषय सदनामध्ये फक्त धोरणात्मक निर्णय सोडुन, एखाद्या महासभेचे धोरण जर निश्चित करायचे असेल आपल्याला आणि पन्नास लाखाच्या वरच्या आर्थिक ज्या मंजुऱ्या आपल्याला घ्यायच्या असतील ह्या मंजुऱ्या आणि धोरणात्मक निर्णय सोडुन बाकी पालिकेचे सर्व विषय आपल्या स्थायी समितीसमोर घेऊ शकतो आणि त्या पद्धतीचे कामकाज आपण सुरुही केलेले आहे. हे प्रशासनाला अवगत आहे म्हणजे प्रशासन त्या बाबतीत काय उत्तर देतील ह्याची मला कल्पना नाही. परंतु मा. महासभेचा धोरणात्मक निर्णय सोडुन आणि पन्नास लाखाच्या वरच्या आर्थिक प्रशासकिय मंजुऱ्या दिल्या तर बाकी सर्व निर्णय आपण घेऊ शकतो.

**प्रभात पाटील :-**

विषय थांबवावा असे रणखांब साहेबांचे विनंती आहे.

**रिटा शाह :-**

विषय थांबवावा, पण ही स्थायी समितीची सभा असते. ते आपण मजाक मस्तीसाठी करत नाही. जेव्हा एका सभासदाने विचारले की, नेमके आमचे अधिकार काय? आम्हाला आमचे अधिकार माहित आहे. पण प्रशासनाने सांगायला पाहिजे की, आमचे अधिकार काय? ते क्लेरीफाय व्हायला पाहिजे. आम्ही बोललो आणि शेवटी आपण बोलणार की, ते प्रशासकीय बसत नाही, मग काय फायदा आणि मला एवढे माहिती आहे की, महानगरपालिकेमध्ये स्थायी समिती ही महानगरपालिकेचा हार्ट असते आणि जेवढे मा. महासभेचा अधिकार नाही तेवढे स्थायी समितीला अधिकार आहेत.

**हॅरल बोर्जिस :-**

दि. ०९/०३/२००५ व दि. २३/०३/२००५ रोजीचे इतिवृत्तांत दुरुस्तीसह कायम करण्यांत यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १९ :-**

दि. ०९/०३/२००५ व दि. २३/०३/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २२ :-**

दि. ०९/०३/२००५ व दि. २३/०३/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २० चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, झालेल्या प्रोसिडिंगबाबत जे काही निर्देश दिले आहे, त्या संदर्भात विचारले तर चालेल ना!

**मा. सभापती :-**

इतिवृत्तांतामध्ये आपण फक्त ग्रॅमेटिकल मिस्टेक काढतो.

**अशोक पाटील :-**

ते झाले, ठराव मंजुर झाला. पण त्या संदर्भात काही विषय आहे. त्यासंदर्भात विचारले तर चालेल ना!

**मा. सभापती :-**

विचारा.

**अशोक पाटील :-**

दि. २३/०३/२००५ च्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. २० वर गजानन भोईर ह्यांनी प्रश्न विचारला होता आणि प्रभात पाटील ह्यांनी दुजोरा दिला होता. घोडदेव स्मशानभुमी व नवघर स्मशानभुमी बाबत आपण विषय घेणार होता.

**मा. सभापती :-**

या संदर्भाबाबत आपण आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करणार होतो आणि तसे असेल आपण ह्या सभेनंतर आयुक्त साहेबांना भेटु या.

**अनंत पाटील :-**

या विषयाची आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करण्याची काय आवश्यकता आहे. आपण पुर्वी मा. महासभेने मुदत वाढ दिली होती, त्या मंडळाला मुदतवाढ देऊन सुद्धा तिथे कुठेही सुविधा केलेल्या नाहीत असे नागरिकांचे म्हणणे आहे. आम्ही प्रत्यक्षात पाहणी केलेली आहे. तर स्थायी समितीने निर्णय घ्यावा. काय करायचे आणि काय नाही.

**मा. सभापती :-**

तो विषय आता विषयपटलावर नाही. आपण कोणत्या बेसवर चर्चा करणार?

**अनंत पाटील :-**

आपण हा विषय विषयपटलावर आणा.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आपण विषय घेण्यासंदर्भात निर्देश दिलेले आहेत.

**मा. सभापती :-**

सिटी इंजिनिअर सोहबांना मी विचारु इच्छितो की, ह्या विषयाची आपल्याला पुर्णपणे माहिती का? नवघर / घोडदेव स्मशानभूमी विकासाच्या बाबतीमध्ये आपल्याकडे माहिती आहे का? ते काम कधी सुरु करण्यांत आले.

**अशोक पाटील :-**

सध्या तो विषय पेपरमध्ये गाजतोय. त्यामुळे वातावरण हे विस्कळीत झाले आहे. नक्की वस्तुस्थिती काय आहे?

**शरदचंद्र वैरागडे :-**

या स्मशानभूमीची दुरुस्ती किंवा रिनोव्हेशन जे चालू आहे. तिथे आयुक्त साहेबांनी स्वतः भेट देऊन ते काम स्पीडली करावे म्हणुन ॲक्शन घेतलेली आहे आणि त्याप्रमाणे काम चालु आहे. ह्या स्मशान भुमीची आपल्याला जी काम करायची होती, म्हणजे ज्या संस्थेला दिलेली होती, त्या संस्थेकडुन काम करुन घ्यायची आहेत. जे पेपरमध्ये आले आहे. असे आपण म्हणता. तर तिथे स्वतः आयुक्तांनी भेट दिली होती आणि आयुक्त साहेबांनीही ते काम लवकर, स्पीडली करावे अशी विनंती केलेली आहे, त्याप्रमाणे ते काम चालु आहे.

**अशोक पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे मा. महासभेसमोर दोन वर्षापुर्वी हा विषय आला होता. त्यावेळी त्या संस्थेला तीन महिन्यामध्ये काम चालु करण्याबद्दल ठराव झाला होता. तीन महिन्यात त्या संस्थेने काम चालु करावे, जर काम चाले केले नाही तर त्यांचे जे करारपत्र आहे ते रद्दबादल ठरविण्यांत येते. अशा संदर्भातील ठराव मा. महासभेमध्ये झालेला होता. तर त्या तीन महिन्यानंतर हे काम सुरु झालेले नाही का?

**शरदचंद्र वैरागडे :-**

आता काम चालु आहे.

**अशोक पाटील :-**

आता म्हणजे जस्ट काम चालु आहे का?

**शरदचंद्र वैरागडे :-**

सुरुवातीपासुनच काम चालु होते. पण आताची पोझीशन मी सांगतोय की, आता काम चालु आहे आणि ते काम लवकरात लवकर संपेल असे आयुक्त साहेबांना संस्थेने आश्वासन दिलेले आहे.

**अशोक पाटील :-**

प्रशासनाकडे करारपत्राच्या रेकॉर्डला कॉपी नाही. म्हणजे संस्थेने दिल्या नाहीत की प्रशासनाचा ढिसाळपणा वगैरे आहे का?

**शरदचंद्र वैरागडे :-**

करारपत्र रेकॉर्डला आहे का नाही. ते बघुन सांगतोय.

**अशोक पाटील :-**

म्हणजे अजुन बघितलेदेखील नाही.

**शरदचंद्र वैरागडे :-**

आम्ही बघितलेले आहे. पण त्याची जी डिटेल आहे ते आपल्याला बघुन पुर्णपणे सांगतो.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, पुढच्या सभेत अजेन्डावर विषय घ्या. म्हणजे आपल्याला सर्व सविस्तर माहिती मिळेल.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, हा विषय पेपरमध्ये गाजत असताना त्या विषयावर सर्व जनतेचे लक्ष आहे की, घोडदेव आणि नवघरचे स्मशानभुमी हा विषय मा. महासभेमध्येसुद्धा येतोच येतो. सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांच्याकडुन किंवा तत्सम नगरसेवकांकडुन हा विषय येतोच येतो. नागरिकांचे ही म्हणणे आहे की, तिथे काहीच सुधारणा झालेली नाही आणि एवढे होऊन सुद्धा प्रशासनाने त्या संदर्भामध्ये काही काळजी घेऊ नये हे दुर्दैव आहे. म्हणजे प्रशासन वृत्तपत्रावर विश्वास ठेवते की, नाही ठेवत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी सन्मा. सदस्य अनंत पाटीलजी, सन्मा. सदस्य गजानन भोईरजी, सन्मा. सदस्या प्रभात पाटीलजी आणि सर्व सन्मा. सदस्यांनी ह्या चर्चेत सहभाग घेतला आणि त्याच चर्चेबद्दल वृत्तपत्रामध्ये काही बातम्या येतात त्याच्यामुळे गेल्या दोन तीन वर्षामध्ये स्मशानभुमी विकसित करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे दिसते आणि प्रत्येकवेळी चर्चेला विषय येतो. म्हणुन आपल्या सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने सचिवजी पुढच्या वेळेला हा स्मशानभुमीचा विषय आपण घोडदेव स्मशानभुमी आणि नवघर स्मशानभुमी विकसित करण्याबाबतचा विषय आपणाला विषयपटलावर घ्यायचा आहे. त्या संदर्भामध्ये सिटी इंजिनिअर आपण ही सर्व माहिती, त्यांचे करारनामे आपण ज्या विविध संमती घेतलेल्या आहेत. सभागृहाकडुन घेतलेल्या आहेत. त्याची संपुर्ण माहिती आपण पुढच्या सभेला या ठिकाणी घेऊन या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २० चे वाचन केले.)

**कैलासबेन जानी :-**

सभापती महोदय, जे फी वाढवायची सांगितले आहे. तर तिथे गरीब मुले शिकतात, वाचनालयामध्ये येतात. त्यांची फी वाढवायला नाही पाहिजे असे माझे मत आहे.

**गजानन भोईर :-**

विद्यार्थी वर्गाला फी वाढवु नका.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आपण हा विषय फेटाळला होता.

**प्र. सचिव :-**

तहकुब प्रकरण आहे.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातुन शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्याला जेवढे भरघोस योगदान द्यायला पाहिजे. अशापद्धतीची महापालिकेची मानसिकता आहे आणि वाचनालयाची फी वाढविण्याचा विषय मागच्यावेळी आला होता, तो विषय तहकुब ठेवण्यांत आला होता. फी वाढविली पाहिजे आणि फी वाढवुन त्याचा उपयोग झाला पाहिजे. ह्या दोन्ही बरोबर असल्यातरी या ठिकाणी या सभागृहामध्ये सन्मा. सदस्या कैलासबेन जानी आणि इतर सदस्यांनी आपले मत व्यक्त केले. शाळेतला जो विद्यार्थी आहे त्या

विद्यार्थ्यांकडुन कोणतीही फी वाढवुन घेऊ नये. आणि त्या व्यतिरिक्त इतर जे सदस्य आपल्याकडे येतात. त्यांच्याबद्दल आपण थोडाफार विचार करु.

**प्रभात पाटील :-**

सध्या वाचनालयाची फी काय आहे, आपण महिन्याला किती डिपोझिट घेतो त्याची माहिती मिळावी.

**सुर्यकांत भोईर :-**

जे पुस्तके घेतले जातात ते रिटर्न येत नाही त्याकरीता आपण डिपोझिट वाढवुन घ्या.

**मा. सभापती :-**

सध्या फी किती आहे, त्याची माहिती द्या.

**रिटा शाह :-**

पुस्तक रिर्टन येत नाही. त्याकरीता पुस्तकाची डिपोझिट वाढवुन घ्या. नगरसेवकांनीही पुस्तके नेलेली आहेत. महाग महाग पुस्तके असतात. त्यामुळे तुम्ही डिपोझिट ठेवा.

**कैलासबेन जानी :-**

काही विद्यार्थीही पुस्तके घेऊन जातात.

**मा. सभापती :-**

विद्यार्थ्याविषयी कोणतीही वाढ करु नये आणि त्याच्या व्यतिरिक्त जो विद्यार्थी ज्या शाळेमध्ये आहे, त्याची संपुर्ण माहिती घेतल्यानंतर त्या शाळेमध्ये त्याचे लिव्हिंग सर्टीफिकेट सर्व काही असते. ते त्याची डिपोझिट आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, लिव्हिंग सर्टीफिकेट नाही, त्या शाळेच्या प्रिन्सिपलचा फॉर्मवर स्टॅम्प मारुन सही आणायला सांगा.

**मा. सभापती :-**

विद्यार्थ्यांकरीता असे करायचे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, मी एक सुचना करतोय, समजा मी एक पुस्तक घेऊन गेलो आणि टेलिफोन नंबर दिला आणि त्याला जर मला कॉन्टॅक्ट करायचे असेल तर त्यांना तिथे कुठलीही सुविधा नाही. टेलिफोन नाही. जर एखाद्यावेळी आम्हाला कुठले पुस्तक हवे असेल, राई-मोर्वा, उत्तनचा मुलगा असेल तर त्याला वीस-पंचवीस रुपये खर्च करुन यावे लागेल. त्यावेळी त्याला समजेल की, तिथे पुस्तक नाही. तेव्हा तो परत जाणार. माझी आपणाला विनंती आहे, वाचनालयामध्ये ताबडतोब फोनची व्यवस्था करावी.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आणि कैलासबेन जानी ह्यांनी प्रस्ताव उपस्थित केला, डिपोझिटचा न घेण्याचा विषय फक्त विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित आहे.

**प्रभात पाटील :-**

विद्यार्थ्यांच्या भुमिकेबद्दल आणखीन एक प्रश्न आहे की, बारावी-दहावी किंवा इंजिनिअरिंगची मुले जेव्हा वाचनालयामध्ये आपल्या अभ्यासिकेचा वापर करतात. अभ्यासिकेमध्ये जाऊन बसतात त्यांना कोणतीही अभ्यासिकेची फी लावता कामा नये. आपली तिथे अभ्यासिका आहे. बरेच नगरसेवकांचे शिफारस पत्र घेऊन तिथे विद्यार्थी जातात. त्या अभ्यासिकेवर त्यांना कोणताही दर लावु नये. ते तिथे शांततेसाठी जातात. त्याच्यात वाढ केली जाऊ नये.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, आपल्याकडचा जो फिक्स स्ट्रक्चर आहे तो १९९४ सालचा आहे, त्यानंतर आपण कोणतीही वाढ केलेली नाही. आपण आता जे रेकमेन्डेशन केलेले आहे. फॉर्म फी पाच रुपये म्हटले आहे. ते पुर्वी एक रुपया घेतला जात होता. नोंदणी वीस रुपये म्हटले आहे ते आपण पुर्वी दहा रुपये घ्यायचे. मासिक फी वीस रुपये दिले आहे ते पुर्वी आपण काही घेत नव्हतो.

**प्रभात पाटील :-**

नोंदणीमध्ये किती वाढ करतोय.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

नोंदणीमध्ये पुर्वी दहा रुपये घ्यायचो आणि आता वीस रुपये रिकमेन्डेशन केले आहे.

**प्रभात पाटील :-**

जर नोंदणीमध्ये वाढ होत असेल तर मासिक फी मध्ये वाढ करु नका.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मासिक फी घेऊच नका.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य विद्यार्थ्यांना आपण कोणतीही वाढ सुचवत नाही आणि जी वाढ सुचवत आहे ते इतर जे नागरिक आहेत. त्यांना ही वाढ सुचवतोय.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, माझे मत मी सांगते ते आपण विचारात घ्या किंवा नका घेऊ. परंतु, माझे मत सांगते की, टि. व्ही. माध्यमामुळे वाचन संस्कृती एकदम बंद पडली आणि ही वाचन संस्कृती आपल्याला टिकवायची असेल तर लोकांना एक कारण होते, वाचनालयाची फी वाढली. जाण्या-येण्याचा खर्च आहे. म्हणुन जी मासिक फी तिथे आपण वाढ करु नका असे माझे म्हणणे आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मासिक फी वीस रुपये सुचवलेली आहे. ती पुर्वी आपण वार्षिक फी शंभर रुपये घ्यायचो आणि ह्यावेळेस वार्षिक फी आपण रिकमेन्डेशन केलेली नाही. म्हणजे आपण वार्षिक फी घेणार नाही. फक्त मासिक फी घेणार आहोत. ही जी वाढ सुचवलेली आहे, त्याच्यामध्ये सिक्युरिटीही आपल्याकडे असायला पाहिजे. कारण लोक पुस्तके घेऊन जातात आणि आणुन देत नाही.

**प्रभात पाटील :-**

म्हणजे शंभर रुपये जी वार्षिक फी होती ती आपण आता घेणार नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

घेणार नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण ग्रंथपालांना विचारा, कारण माझ्याकडे सतत बी-कॉम, इंजीनीअरची मुले येतात. त्या विद्यार्थ्यांसाठी फीमध्ये वाढ करा असे आम्ही सांगत नाही. पण जे पुस्तक आपण आणतो ते कॉलेजची इंजिनिअरींगची पुस्तके किमंती असतात आणि त्याच्यावर जर आपण डिपोझिट सिस्टम लावली नाही आणि ते जर पुस्तक घेऊन गेले तर परत देतच नाही. अशी किती पुस्तके हरवली आहेत. नगरसेवकांनीही नेलेले आहेत आणि इतर लोकांनीही पुस्तके नेलेले आहेत. पुस्तक आपल्याकडे जमा होतच नाही. डिपॉझिट जर आपण घेतले नाही, तर पुस्तके आपण आणणार आणि अशीच जाणार. डिपॉझिट घेणार ते रिटर्नेबल ठेवा. पुस्तक दिले तर ते पैसे आपण त्यांना परत द्यायचे.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यासाठी असे करा, की साधारणतः अमुक एक रक्कमेच्या वर जर पुस्तकाची किंमत असेल तर त्याची पन्नास टक्के डिपॉझिट घ्या. असा नियम करा. जी पुस्तके जास्तीत जास्त महाग आहेत.

**गजानन भोईर :-**

मॅडम, आपण ह्याची माहिती द्या.

**प्रभात पाटील :-**

कॉलेजची जरी लायब्ररी असेत तरी तिथे डिपॉझिट घेतले जाते.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मुले पुस्तके घेऊन जातात आणि ते रिटर्न करत नाही.

**गजानन भोईर :-**

नगरसेवकांमध्येही असेच आहे. दोन-तीन नगरसेवक आहेत. त्यांनी पुस्तके रिटर्न केलेली नाहीत. त्याच्यात माजी नगरसेवकही आहेत आणि आजी नगरसेवकही आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आतापर्यंत किती पुस्तके गेली व ती परत केली नाही. त्याची माहिती द्या.

**कैलासबेन जानी :-**

मॅडम, ज्यांनी पुस्तके घेऊन गेली आणि परत दिले नाही अशी आपल्याकडे नोंद आहेत का?

**गजानन भोईर :-**

अशी कॉलेजची कोण मुले आहेत का?

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर सोहब, पुस्तक परत दिले की नाही ते महत्त्वाचे नाही. एकदा आपण सिस्टम लावली डिपॉझिट ते रिटर्नेबल आहे. पन्नास दिले आणि ते पुस्तक परत दिले तर पैसे परत देणार. त्याला कुठे खर्च आहेत.

**गजानन भोईर :-**

नगरसेवकांची, शाळेतील मुलांची आपल्याकडे नावे आहेत आहे का? असे विचारतोय.

**विश्वभारती चहांदे :-**

आपला मुळातच विषय असा की, डिपॉझिट घ्यावे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

डिपॉझिट घ्यावे की, न घ्यावे तो प्रश्न आमचा आहे. तुम्ही आम्हाला एवढेच सांगा जे विद्यार्थी पुस्तके घेऊन जातात. त्यांच्याकडुन पुस्तके परत आली का, नाही. त्याचा आम्हाला आकडा सांगा.

**विश्वभारती चहांदे :-**

जे विद्यार्थी अभ्यासिकेत असतात त्यांना आपण तिथल्या तिथे पुस्तके वाचायला देतो, घरी न्यायला देत नाही. अभ्यासिकेतले जे सदस्य आहेत ते फक्त अभ्यास करायला येतात. इतर जे आहेत ते आपल्या वाचनालयामध्ये सभासद असतात. त्यांना आपण पुस्तके देतो.

**गजानन भोईर :-**

म्हणजे कॉलेजची मुले पुस्तके घरी नेत नाही.

**रिटा शाह :-**

पुस्तके घरी न्यायची असतील तर डिपॉझिट घेऊन नेऊ द्या.

**विश्वभारती चहांदे :-**

आपण जर डिपॉझिट घेतले तर त्यांना देखील आपण पुस्तके देऊ शकु.

**गजानन भोईर :-**

असे आजी-माजी नगरसेवक आहेत का, ज्यांनी पुस्तके दिली नाहीत?

**विश्वभारती चहांदे :-**

सध्या मला आठवत नाही.

**कैलासबेन जानी :-**

आठवत नाही असे नाही, कोण नगरसेवक पुस्तक घेऊन गेले आणि परत केले नाही ते सांगा. त्यामुळे जे चित्र आहे ते चित्र स्पष्ट समोर येईल.

**गजानन भोईर :-**

कोण नगरसेवकांनी पुस्तके परत केली नाही त्यांचे नाव सांगा.

**विश्वभारती चहांदे :-**

पुस्तके वाचुन प्रामाणिकपणे परत करावीत अशी आमची इच्छा आहे.

**कैलासबेन जानी :-**

असे किती लोकांनी पुस्तके ठेवुन दिली आहेत आणि परत दिली नाही?

**विश्वभारती चहांदे :-**

आपले जे सभासद आहेत त्यांच्याकडुनच.

**मा. सभापती :-**

आपले म्हणणे असे आहे की, विद्यार्थ्यांना जी सुट आणि सवलत आहे ती देऊ या, पण जनरलमध्ये नगरसेवक असु दे किंवा पब्लिक असु दे. कारण जर आपल्याला आपल्या वाचनालयाचे मेनटेनन्स ठेवायचे असेल तर किमान फी भरतोय या नात्याने आपल्याला एक जबाबदारी येते आणि हे पुस्तक जर आपल्याला फुकट वाचायला मिळाले तर त्याची आपण कदर करत नाही. त्यापद्धतीने त्याची कदरही झाली पाहिजे. त्याचे मेनटेनन्स व्यवस्थित झाले पाहिजे म्हणुन विद्यार्थ्यांना जेवढी सुट देता येईल येत असेल तेवढी सुट आपण विद्यार्थ्यांना देऊ या आणि नगरसेवक व अन्य जे पब्लिक आहेत, त्याच्यात अधिकारीसुद्धा आले त्या सर्वांनी फी द्यायला पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

पाच लाखाची पुस्तके आणली आणि दोन लाखाची पुस्तके नगरसेवकांनी घरी ठेवुन दिली. मग काय करायचे?

**गजानन भोईर :-**

मॅडम आपल्याकडे किती पुस्तके होती आणि सध्या किती शिल्लक आहेत? कारण चार-पाचशेच्या घरात तो आकडा आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्या विषयाच्या संदर्भात मी एवढेच बोलते की, नविन सभासद जेव्हा आपल्याकडे नोंदणी करायला येतो, त्यावेळी त्याच्याकडुन सभासद म्हणुन डिपॉझिट घ्यायचे आणि शेख साहेबांनी जे वाचले, विद्यार्थी सोडुन इतर जे आहेत त्यांच्यावर मासिक आकारणी करण्यांत यावी. असा मी ठराव मांडते.

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

चोरीला गेलेल्या पुस्तकांची संख्या नको का?

**प्रभात पाटील :-**

मागवा.

**विश्वभारती चहांदे :-**

आपल्याकडे साधारणतः अकरा हजार सातशे सत्तर इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती अशी पुस्तके आहेत. त्यातले मराठी-३१ पुस्तके सभासदांकडे आहेत. इंग्रजी-५५ पुस्तके, हिंदी-१६ पुस्तके आणि गुजराती-२ पुस्तके सभासदांकडे आहेत. त्यांच्याकडुन आपण डिपॉझिट न घेतल्यामुळे सभासद आपल्याकडे येऊ शकत नाही.

**रिटा शाह / सुर्यकांत भोईर :-**

डिपॉझिट घ्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

डिपॉझिट घ्या आणि जी वसुली करायची आहे. त्यापद्धतीने जी कार्यवाही तुम्हाला करता येईल ती तुम्ही तुमच्यापद्धतीने करुन घ्या आणि पुस्तक प्राप्त करण्याचा प्रयत्न आपण जरुर करा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, फोनची व्यवस्था करण्यांत यावी.

**मा. सभापती :-**

वाचनालयामध्ये फोनची व्यवस्था करण्यांत यावी.

**रिटा शाह :-**

साहेब, पण डिपॉझिट किती घ्यायचे? पुस्तकाची किंमत जर साडेचारशे असेल तर अर्धी किंमत डिपॉझिट घ्यायची का?

**प्रभात पाटील :-**

सभासद नोंदणी घ्यायचे आहे. डिपॉझिट नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

सभासद नोंदणी ज्यावेळेस होणार त्याचे तीनशे रुपये सजेशन केलेले आहे. डिपॉझिट म्हणुन घ्यावे.

**प्रकरण क्र. २० :-**

वाचनालयाच्या फीमध्ये सुधारणा करणेबाबत (दि. २४/०५/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४)

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अद्ययावत असलेले वाचनालय आहे. सदर वाचनालयात शहरातील नागरीक, विद्यार्थी, सर्व थरांतील नागरीक त्याचा लाभ घेत आहेत. वाचनालयात खालीलप्रमाणे वर्गणी आकारली जाते.

| | | |
|---|---|---|
| १. फॉर्म फी | --- | रु. १/- |
| २. नोंदणी फी | --- | रु. १०/- |
| ३. वार्षिक वर्गणी | --- | रु. १००/- |
| ४. वार्षिक अभ्यासिका फी | --- | रु. २/- |
| ५. ग्रंथ विलंब शुल्क | --- | पै. ००.५०/- (प्रति दिवस) |

❖ पुस्तक हरविल्यास, खराब झाल्यास पुस्तकांची छापील किंमत + रु. १०/- इतकी रक्कम घेतली जाते.

वाचनालयातील सदस्याकडून आपण वार्षिक वर्गणी रु. १००/- घेतो. वर्गणी संपल्यावर सभासदत्व आपोआप रद्द होते. सभासदत्व रद्द झालेल्या सभासदांना स्मरणपत्र पाठवून, त्यांच्या घरी जाऊन ही त्यांचेकडे असलेले पुस्तक परत करीत नाही. तसेच आपण अनामत रक्कम घेत नसल्याने सभासदांकडून पुस्त परत मिळविणे अथवा पुस्तकाची किंमत वसुल करणे शक्य होत नाही. **सभासदांकडून अनामत रक्कम घेतल्यास पुस्तक परत न करणा-या सदस्यांच्या अनामत रक्कमेतून**

**पुस्तकांची किंमत वसुल करणे शक्य होईल.** तरी वाचनालयाच्या फी मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणे योग्य होईल.

१. फॉर्म फी --- रु. ५/-
२. नोंदणी फी --- रु. २०/-
३. मासिक वर्गणी --- रु. २०/-
४. अनामत रक्कम --- रु. ३००/-
(पुस्तकांची किंमत जास्त असल्यास जादा अनामत घेण्याची सुविधा.)
५. ग्रंथविलंब शुल्क प्रति दिवस --- रु. १/-
(पुस्तक घरी देण्याचा कालावधी ७ दिवसा ऐवजी १५ दिवस इतका असावा.)

तसेच वाचनालयात कार्यरत असलेल्या सभासदांना देखील वरीलप्रमाणे वर्गणी वाढवण्यास मा. स्थायी समिती सभेचे शिफारस असे. तसेच वाचनालयातील सर्व वर्गणीदांना कळविण्यात यावे. नविन होणाऱ्या सभासदांना दि. १ जुलै २००५ पासून सदरची फी चालू करण्यांत यावी. वरील फी वाढ सर्व सभासदांना लागू होईल.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील. अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, हे आम्हाला परवाच्या दिवशी मिळाले आहे आणि आम्ही अजुन ह्याच्यावर अभ्यास केलेला नाही.

**गजानन भोईर :-**

आपण हा विषय पुढच्या सभेत ठेवा. आम्ही अजुन ह्याच्यावर अभ्यास केलेला नाही.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सेवाशर्तीबद्दल आपली महानगरपालिका स्थापन झाल्यापासुन, आपले सर्व सन्मा. सदस्य या प्रयत्नामध्ये आहेत की, आपल्याकडे असलेले कर्मचारी अधिकारी जो वर्ग आहे ह्यांना योग्य ते प्रमोशन मिळाले पाहिजे. अशा पद्धतीची धारणा आणि अशा पद्धतीची मानसिकता सर्व सन्मा. सदस्यांची आहे आणि त्याकरीता आपण आज याठिकाणी सेवाशर्तीचे जे नियम बनवले आहेत. मागच्या स्थायी समितीमध्ये आपण त्याला मंजुरी दिली आणि श्री. राजपाठक ह्याची नेमणुक केली आणि सन्मा. राजपाठकजी सभेला उपस्थित आहेत. ह्यांनी इतर महानगरपालिकेमध्ये जे सेवा अटीशर्ती आहेत, नियम आहेत त्यांचा संपुर्ण अभ्यास केलेला आहे आणि सेवानियमही बनवलेले आहेत. त्यांच्या त्या भरपुर अनुभवाने आपण या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये त्यांची सेवा मिळावी. अशा पद्धतीचा प्रयत्न केला. त्याला यशही आलेले आहे. त्याबद्दल थोडीशी माहिती आपण आम्हाला द्यावी आणि सन्मा. सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे आपण हा विषय पुढच्या सभेमध्ये आणतोय. संपुर्ण वाचुन त्याच्यावर चर्चा करु या. परंतु, त्याबद्दल जी सर्वसाधारण माहिती आहे, इतर महानगरपालिकेमध्ये आणि आपल्या महानगरपालिकेमध्ये काय कोणत्या पद्धतीने हे नियम लावले आहेत, लावायला पाहिजे. अशा पद्धतीची जी आपली धारणा आहे व आपला जो अनुभव आहे तो कृपया आपण या सभेसमोर मांडावा. अशी मी आपल्याला विनंती करत आहे आणि आपले स्वागत करतो.

**प्र. द. राजपाठक :-**

मा. सभापतीजी आणि स्थायी समितीचे सदस्य, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सेवाप्रवेश नियम बनवताना मी अधिकाऱ्यांबरोबरच संबंधित कर्मचाऱ्यांशीही बऱ्याच वेळा चर्चा केली आणि त्यातुन असे लक्षात आले की, अनेक वर्ष हे कर्मचारी येथे काम करत असले तरीही त्या कर्मचाऱ्यांना सेवाप्रवेश नियम नसल्यामुळे बढतीची संधी मिळालेली नव्हती. ती बढतीची संधी मिळावी अशी मा. आयुक्त साहेबांचीही इच्छा होती आणि त्यासाठी एक स्वतंत्र नियम या नियमावलीमध्ये नमुद करण्यांत आलेला आहे. महापालिकेचे जे कर्मचारी अनेक वर्ष सर्व्हिसमध्ये आहे त्यांना त्यांची सेवा आणि अनुभव लक्षात घेऊन

बढतीची संधी मिळण्यासाठी स्वतंत्र नियम केलेला आहे आणि ह्या नियमाप्रमाणे फक्त महापालिकेच्या सेवेतील कर्मचा-यांनाच बढती देता येईल.

**प्रभात पाटील :-**

आपण महानगरपालिकेचे कर्मचारी म्हणता. पण ही महानगरपालिका होऊन फक्त तीन वर्ष झाली आहेत. नगरपालिकेचे कर्मचारी महानगरपालिकेत आलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरपालिका आणि महानगरपालिका असा आपण उल्लेख करा.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला नेमक काय म्हणायचे आहे?

**प्र. द. राजपाठक :-**

ग्रामपंचायत असली किंवा ह्याच्यापूर्वीची नगरपालिका असली तरी त्या ग्रामपंचायतीमध्ये किंवा नगरपालिकेमध्ये केलेली सेवा ही महापालिकेमध्ये केलेली सेवा आहे. अशी कायद्यात तरतुद आहे. त्यामुळे ती सेवा ऑटोमेटीकली महापालिकेची सेवा म्हणुन धरली जाईल. त्यानंतर महानगरपालिकेच्या कर्मचा-यामध्ये सरळसेवेने जी पदे भरली जातात. त्यामध्ये ही संधी असावी. कारण बरेचवेळा असे होते की, जरी शैक्षणिक पात्रता असली तरी परिस्थितीच्या रेट्यामुळे खालच्या पोस्ट एखादा माणुस एक्सेप्ट करुन काम करायला सुरुवात करतो. त्याच्यामध्ये कर्तृत्व असते, सगळं असते. नामनिर्देशनाने ज्यावेळेला ही पदे भरायची असतील, त्यावेळेला महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना त्यांची महानगरपालिकेमध्ये जेवढी सेवा झालेली असेल. तेवढ्या सेवेची सुट त्यांना देण्यांत येईल. म्हणजे एखाद्या पदाकरीता ३५ वर्षाची वयोमर्यादा आहे आणि एखाद्या कर्मचा-याचे वय ४५ वर्ष झालेले आहे. जरी त्याचे वय ४५ वर्ष झालेले असेल तरी तो महापालिकेमध्ये गेली १०-१५ वर्ष सर्व्हिसला असेल. ३५ १५ म्हणजे पन्नास वर्षापर्यंतच्या कर्मचा-याला त्या पदाकरीता नामनिर्देशन सरळ पदाकरीता अर्ज करता येईल. अशाही त-हेची तरतुद केलेली आहे.

**गजानन भोईर :-**

त्याला शैक्षणिक पात्रतेची गरज आहे का?

**प्र. द. राजपाठक :-**

शैक्षणिक पात्रतेची गरज प्रत्येक पदाकरीता आहे.

**गजानन भोईर :-**

ही अट आपल्याला कमी करता येणार नाही का?

**प्र. द. राजपाठक :-**

ते आपण ठरवायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

जुने जे नगरपालिका, ग्रामपंचायत काळापासुन जे कर्मचारी आहेत त्यांचे शिक्षण कमी आहे.

**गजानन भोईर :-**

शिक्षण घेतले आहे त्या कर्मचा-यांनीही तेवढे काम केले आहे आणि ज्यांनी शिक्षण घेतले नाही त्यांनीही तेवढेच काम केलेले आहे. हा त्यांच्यावर अन्याय का?

**प्र. द. राजपाठक :-**

शिक्षण न घेतलेले म्हणजे मला नेमके समजले नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

जे ग्रामपंचायतपासुन, नगरपालिकेमध्ये आणि महानगरपालिकेमध्ये जे कर्मचारी कामावर आहेत, अधिकारी आहेत, त्यांचे शिक्षण कमी आहे पण तरीही त्यांची पदोन्नती झाली पाहिजे. कारण त्यांना त्या कामाचा अनुभव जास्त आहे. त्यांच्यासाठी आपण काय कायदा करु शकता?

**प्र. द. राजपाठक :-**

नियमात जी तरतुद केली आहे, ती वाचून दाखवू का?

**सुर्यकांत भोईर :-**

तरतुद वाचुन दाखवा.

**गजानन भोईर :-**

पण आपण हा विषय पुढच्या सभेत ठेवायचा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

माहिती तर घेऊ.

**मा. सभापती :-**

आमचे सन्मा. सदस्य माजी सभापती मॉरसजी रॉड्रीक्स ह्यांना तातडीचे काम आहे व त्यांनी सांगितले की, हा विषय महत्त्वाचा आहे. त्यामुळे ते आले आहेत. त्याकरीता माहिती घेऊन हा विषय पुढच्या सभेत घेऊ.

**प्र. द. राजपाठक :-**

पान क्र. ८ (ड) रिक्त पदांची संख्या तसेच महापालिकेतील कर्मचाऱ्यांची उपलब्धता विचारात घेऊन विशेष बाब म्हणुन गट (ब) पर्यंतच्या नामनिर्देशनाद्वारे भरावयाच्या पदांसाठी फक्त महापालिका कर्मचाऱ्यांसाठी मर्यादित अशी सेवाभर्ती करण्याचा महापालिकेला अधिकार असेल. त्यासाठी पोटनियम (अ) प्रमाणे कार्यवाही करायची.

**रिटा शाह :-**

गट (ब) साठी तर क्लास वन नाही.

**प्र. द. राजपाठक :-**

क्लास थ्री मधुन एकदम क्लास वनला देणे, मला तरी योग्य वाटत नाही.

**रिटा शाह :-**

क्लास टु ला असेल त्यांना.

**प्र. द. राजपाठक :-**

क्लास टु ला असेल तर ते रेग्युलरमध्ये येतात.

**रिटा शाह :-**

आमच्याकडे असे ग्रामपंचायत काळापासुन कर्मचारी आहेत की ते गट (ब) ला काम करतात, ते क्लास वन सारखे काम करतात मग त्यांचे काय? ते क्लास वन ऑफिसरसारखे काम करतात. त्यांना कामाचा चांगला अनुभव आहे. ॲक्चुली ते क्लास वन असायला पाहिजे. पण तांत्रिक बाबींमुळे आणि त्यांचे शिक्षण कमी पडत होते., त्यामुळे त्यांची पदोन्नती राहिली. पण आज आमच्याकडे जो क्लास वन ऑफीसर आहे. त्याच्यासारखेच काम दहा-दहा वर्षापासुन करत आहे. त्यांची पदोन्नती आपण गट (ब) मध्ये घेणार तर कसे चालणार आहे?

**प्र. द. राजपाठक :-**

गट (ब) मध्ये ते ऑलरेडी काम करतात.

**रिटा शाह :-**

ते गट (ब) मध्ये आहेच. त्यांना क्लास वनची पोस्ट द्यायचे आहे.

**गजानन भोईर :-**

क्लास वन पेक्षा ते जास्त काम करत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

जे अधिकारी बाहेरुन आलेले आहेत. ते काम न करता, आमचे जे जुने कर्मचारी आहेत ते चांगले काम करतात.

**प्र. द. राजपाठक :-**

बाहेरचे आले आहेत. त्यांना परत पाठवुन द्या.

**रिटा शाह :-**

बाहेरचे आहेत त्यांना पाठवायचे अिाण मागचे आहेत. त्यांना ठेवायचे हा प्रश्न नाही. ज्यांचा जो अधिकार आहे तो त्यांना द्यायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

त्यांचा त्यांना अधिकार मिळाला पाहिजे.

**रिटा शाह :-**

आमचे जेवढे कर्मचारी मागचे अिाण आजचे आहेत तेवढे सर्व आम्हाला पाहिजे. पण जे ग्रामपंचायत काळापासुन त्यांची पदोन्नती, त्यांचा अधिकार त्याना भेटायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

बाहेरुन आले आहेत, तेही आमचेच आहेत आणि जुने आहे तेही आमचेच आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, त्यांचा अनुभव लक्षात घेता शिक्षणाची तेवढी गरज आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

जे जुने कर्मचारी आहेत त्यांना अनुभवाप्रमाणे पदोन्नती देण्यांत यावी.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी याबाबत चांगल्या सुचना मांडल्या आणि श्री. राजपाठकजी आपल्याला धन्यवाद देतो, आपण विस्तृत माहिती देण्याचा प्रयत्न करत होता. मी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो आणि आपणाला ही सांगु इच्छितो की, पुढच्या सभेला हा विषय येण्यापुर्वी आपण आपल्या दालनामध्ये सर्व सदस्य आणि राजपाठकजी ह्यांना बसवुन चर्चा घडवुन आणु आणि योग्य ती माहिती मिळवुन घेऊ आणि पुढच्या सभेला हा विषय आणुन त्याची शिफारस मा. महासभेपुढे करणार आहोत.

**प्र. द. राजपाठक :-**

आभारी आहे.

**प्रकरण क्र. २१ :-**

सेवाप्रवेश नियम तयार करुन मा. महासभेस मान्यतेसाठी सादर करणे. (दि. २४/०५/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १८)

**ठराव क्र. २४ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याची ठरविण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

आरोग्याचा विषय आहे मी बोलतोय, पावसाळ्यापुर्वी ज्या विहिरी स्वच्छ केल्या. त्याच्यामध्ये औषध टाकायचे होते म्हणुन मी डॉ. बावस्कर साहेबांकडे आणि म्हटले हे काम कोणाचे, तर माझे काम नाही. त्याच्यानंतर पाणी खात्याकडे गेलो त्यांनी सांगितले की, हे आमचे काम नाही, नंतर मी सिटी इंजिनिअरकडे गेलो, ते म्हणे की हे आमचे काम नाही नक्की हे काम कोणाचे आहे? विहिरीमध्ये, तळ्यामध्ये जंतुनाशक औषध टाकायचे ते काम कोणाचे आहे? ते आम्हाला समजु द्या. आरोग्य खाते सांगते हे काम आमचे नाही, बांधकाम खाते सांगते हे काम आमचे नाही.

**मा. सभापती :-**

हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आहे महत्त्वाचे काम आहे. त्यामुळे कोणी खाती सांगु नये. ज्या खात्याला सुचना दिली, पाणी खात्याला किंवा आरोग्य खात्याला दोन्ही खात्याने अग्रेसर काम केले पाहिजे आणि वेळ असेल तर बांधकाम विभागाने काम केले तरीही चालेल. कारण ही अत्यावश्यक बाब आहे आणि त्याने जर लोकांचे नुकसान होत असेल, नागरिकांची सेवा करण्याकरीता आपण हे काम करत आहोत. त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याने हे काम आमचे आहे आणि आमच्या खात्याचे नाही, ते आम्हाला माहिती नाही असे उत्तर देऊ नये आणि त्याबद्दल मला ह्या सभेमध्ये खेद व्यक्त करावासा वाटतो. कारण आवश्यक ज्या बाबी असतात. त्या बाबींमध्ये चालढकल करुन चालत नाही आणि अशा पद्धतीच्या तक्रारी आणि अशा सुचना पुढच्यावेळी स्थायी समितीपुढे येऊ नये असे मी सर्व अधिकाऱ्यांना सांगत आहे. आपण आपले काम समजुन ह्या पद्धतीने काम केले पाहिजे. आरोग्य विभागसुद्धा सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करते. बांधकाम विभाग सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करते आणि पाणी पुरवठा ही सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करत आहे म्हणुन कोणीही हे काम झटकु नये. जर आरोग्य विभागाकडे पुरवठा नसेल तर पाणी खात्याला सांगितले पाहिजे की, अशा पद्धतीची जी औषध आहेत ती आपण दिली पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

अजुनपर्यंत विहीरी आणि तळ्यामध्ये औषध टाकण्यांत आलेले नाही. आपण तिथे कोणत्यातरी एका खात्याला औषध टाकायला सांगा.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य घोन्सालवीसजी आपल्याला तिन्ही खात्याने माहिती दिली नाही का?

**मा. सभापती :-**

पाणी खात्याकडुन विहीरी आणि तळ्यामध्ये औषध फवारणी केली पाहिजे आणि त्यासाठी आरोग्य विभागाचे कर्मचारी उपलब्ध होणे जरुरीचे आहे.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, आपण डॉक्टर साहेबांना जी सहा महिन्याची मुदतवाढ देता तर आपण परमनन्ट डॉक्टर आणायला पाहिजे. आपला स्थायी समितीचा अधिकार नाही, आपण हा विषय मा. महासभेत आणायला पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कलम नं. ५३(१) बघितले तर त्याच्यामध्ये अशी तरतुद नाही की, स्थायी समितीने त्यांना सहा महिन्याची मुदतवाढ द्यावी.

**कैलासबेन जानी :-**

डॉक्टर साहेबांना ठेवायला आमची काही हरकत नाही, पण तरीसुद्धा कायद्याने जे असेल त्याकरीता मा. महासभेसमोर विषय आणला पाहिजे, परमनन्ट डॉक्टर यायला पाहिजे. गर्व्हनमेंटची माणसे आणायला पाहिजे. ते पंधरा हजार पगाराने काम करतील. येथे आपल्याला तीस हजार रुपये त्यांना पगार द्यावा लागतो.

**मा. सभापती :-**

याबाबत सहा. उपायुक्त मनाळे सो., खुलासा करावा.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, वैद्यकिय आरोग्य अधिकारी पद भरणेबाबतचा आपण शासनाला प्रस्ताव पाठवलेला आहे. साधारणतः चार महिन्यापुर्वी प्रस्ताव आपण शासनाला पाठवलेला आहे की, हे पद नियमित स्वरुपाने आमच्याकडे भरावे. त्यामुळे सद्यस्थितीत आपल्याकडे आरोग्य सेवा आणि आरोग्य विभागाचे कामकाज करण्यासाठी आपल्याकडे असलेले डॉ. बावस्कर साहेब आणि त्यांचा अनुभव पाहता सहा महिन्यासाठी पुढे कन्टीन्यु करतोय. त्याच्यासाठी हा प्रस्ताव आपणाकडे दिलेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

शासनाकडुन हा प्रस्ताव किती दिवसात मंजुर होऊन येईल?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

शासनाकडे किती वेळ लागेल हे आपण सांगू शकत नाही. शासनाकडे हा प्रस्ताव विचाराधीन आहे, एवढे नक्की.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याची पुर्तता चालू आहे का? तुम्ही त्याचा पाठपुरावा करता का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब ५३(१) खाली स्थायी समितीला अधिकार नाही, मग तुम्ही आमच्यासमोर हे कशाला आणता?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

याबाबत शासनाकडुन डायरेक्टर हेल्थ सर्व्हिस ह्यांना पत्र पाठवलेले आहे आणि विचारणा केलेली आहे की, कुणी असे अधिकारी असतील तर त्यांनी त्यांचे संमतीपत्र शासनाला कळवावे. याबाबत काही अधिका-यांनी संमती पत्र शासनाकडे गेलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कलम ५३(१) खाली आपण आमच्याकडुन मंजुरी घेत आहात. ते कलमच असे आहे की, स्थायी समितीला मुदतवाढ देण्याचा अधिकार नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हा विषय मा. महासभेसमोर येऊ दे.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

कलम ५३(१) नुसार महापालिकेला अधिकार आहे. ही टायपिंग मिस्टेक आहे. हे ५३(३) आहे. हे अनावधनाने ५३(१) झाले आहे. हे ५३(३) नुसार ही नियुक्ती करतोय आणि ५३(३) नुसार सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती करण्याचा पुर्ण अधिकार स्थायी समितीला आहे.

**रिटा शाह :-**

स्थायी समितीला जर अधिकार नाही. माझा त्यांना विरोध नाही. पण मागच्या सभेत श्री. माळी साहेबांना आपण मुदतवाढ दिली होती. मला असे वाटते की, ती मुदतवाढ बेकायदेशीर झाली. जर स्थायी समितीला अधिकार नसेल तर ह्याच स्थायी समितीनेच त्यांना मुदतवाढ दिलेली आहे.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

५३(१) नुसार मा. महासभेला अधिकार आहे आणि ५३(३) नुसार मा. आयुक्त सो. आणि स्थायी समितीला अधिकार आहे.

**रिटा शाह :-**

श्री. माळी साहेबांची जी मुदतवाढ आहे ती कायदेशीर आहे ना?

**जोजफ घोन्सालवीस :-**

५३(३) मध्ये सुद्धा तेच आहे. आपण सभेसमोर वाचा.

**मा. सभापती :-**

मुदतवाढ देण्याचे अधिकार स्थायी समितीचा आहे. मी अधिकाराबद्दल बोलतोय. बाकी आपण ठरवायचे, काय करायचे ते. पण अधिकार स्थायी समितीला आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मनाळे साहेब, ह्या गोष्टीला आज तीन वर्ष झाले. आम्ही मा. महासभेत आयुक्त साहेबांना सांगितले की, आपल्या येथे परमनन्ट डॉक्टर घ्यावे अशी आपण मागणी केलेली आहे आणि आताही तुम्ही सांगता की चार महिन्यापासुन तुम्ही मागणी करताहेत. आपल्याला शासनाकडुन अजुन काही उत्तर आलेले नाही. ते कधी येणार? पाच वर्ष पुर्ण झाल्यावर येणार की दहा वर्ष पुर्ण झाल्यानंतर त्याच्या मागे कोण आहे?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

याबाबत शासनाकडुन डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिस यांच्याकडे विचारणा केलेली आहे. ह्या पदावर कोणी इच्छुक अधिकारी असेल तर त्याचे संमती पत्र शासनाला कळवावे आणि बऱ्याच अधिकाऱ्यांकडुन असे संमती पत्र शासनाकडे गेलेले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण जर पेपरामध्ये जाहिरात दिली तर शंभर डॉक्टर येतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण ५३ खाली जे कलम सांगतात त्यातील शेवटचे वाक्य वाचा. नेमणुकीच्या उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नविकरण करता येणार नाही. ह्यांचा सहा महिन्याचा कालावधी संपला. आता आपल्याला त्यांची नविकरण करता येणार नाही असा स्पष्ट नियम आहे. मग तुम्ही आमच्याकडुन मुदतवाढ का घेता?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभापती साहेब, आपण येथे डॉक्टर साहेबांना बोलावतो ते फक्त घनकचऱ्यासाठी, माझे मत असे आहे की, सहा महिने जर मुदतवाढ द्यायची असेल तर फक्त घनकचऱ्यासाठी द्यायची आणि जे औषधउपचार करायचे असतील ते श्री. शिंदे व श्री. कांबळे ह्यांना सोपावुन द्यायचे असे दोन विभाग करा. तेव्हा हे काम सोपे होईल. कारण ह्या घनकचऱ्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडुन कुठलेही उत्तर दिले जात नाही किंवा कुठले औषध वापरले जात नाही. ह्या तक्रारी सर्व स्थायी समितीने वारंवार ऐकलेल्या आहेत. मा. महासभेत सुद्धा ऐकलेल्या आहे, असे होता कामा नये म्हणुन ह्यांचे डिव्हाडेशन करुन, दोघांनाही काम सोपवावे असे मी स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण स्थायी समितीकडुन मंजुरी का घेता, आपण मा. महासभेकडुन मंजुरी घ्या. जे नियम आहे त्या नियमाप्रमाणे वागा. कशाला उगीच आम्हाला फासावर लटकवता? जे कायद्यात नाही, ते कशाला करता?

**कैलासबेन जानी :-**

नियमात बसत असेल तर मंजुरी देऊ.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जे आपल्या हातात नाही, आपल्या कक्षेबाहेर आहे, तर कशाला?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपल्या तक्रारी नेहमी डॉक्टरांमुळे असतात, सर्वांचे असतात. पण प्रश्न तो नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तक्रारी नाही. हे नियम आपले आहे का?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण जर कामाचे वाटप केले तर माणसं वाढतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

डॉक्टर आमचे दुश्मन आहेत का? डॉक्टर कामसु आणि चांगले आहे असे आमचे मत आहे. पण कायद्यात जर बसत नसेल तर तुम्ही कसे करून घेणार?

**कैलासबेन जानी :-**

आपण आम्हाला परमनन्ट डॉक्टर द्या. नाहीतर, त्यांना परमनन्ट करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण हा विषय मा. महासभेत घ्या आणि तिथे मंजुर करुन आणा.

**मा. सभापती :-**

कलम ५३ (३) चे वाचन करा.

(मा. सहा. आयुक्त श्री. रमेश मनाळे सो. ह्यांनी सभागृहात कलम ५३(३) चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

स्थायी समितीची मंजुरी वाचुन आयुक्त करु शकत नाही असे आहे. ह्याचा अर्थ असा आहे की स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीशिवाय आयुक्तांना नविकरण देता येणार नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

एकदा त्यांना मुदतवाढ दिली सहा महिन्याची, त्याच्यानंतर पुढची मुदतवाढ आपल्याला देता येणार नाही असा त्याचा अर्थ होतो.

**मा. सभापती :-**

आपल्या परवानगीने देता येईल.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

स्थायी समितीच्या मंजुरीशिवाय आयुक्तांना देता येणार नाही असे आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य घोन्सालवीसजी मागे श्री. माळी साहेबांना मुदतवाढ दिली ती रद्द होईल का? १८/०५/०५ ला त्यांची मुदत संपली आता त्यांना परत जर मुदतवाढ द्यायची असेल तर ५३(१) अन्वये, स्थायी समितीची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय आयुक्त साहेब त्यांना मुदतवाढ देऊ शकत नाही असा ह्याचा अर्थ होतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण हा विषय मा. महासभेत घ्या. आम्ही कायद्याच्या विरुद्ध काहीही देणार नाही.

**मा. सभापती :-**

कायद्याच्या विरुद्ध नाही. हे कायद्यात बसते. बाकी तुम्ही सांगायचे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण आता असे सांगता आणि नंतर काहीतरी सांगणार.

**हॅरल बोर्जिस :-**

कायद्याच्याविरुद्ध आम्हीही काही काम करु शकत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जोजफजी घोन्सालवीस आपण जे बोलता ते आम्हाला मान्य आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुम्ही सोयीनुसार अर्थ लावणार तर कसे होईल?

**मा. सभापती :-**

ह्याच्यापुर्वी श्री. माळी ह्यांना ही आपण परवानगी दिलेली आहे आणि माळी ह्यांनी ही काम केलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कलमाचा अर्थ ठरलेला आहे. एकदा मुदतवाढ दिल्यानंतर परत मुदतवाढ देता येत नाही.

**मा. सभापती :-**

कलम असे सांगत नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

आपल्या पुर्व परवानगीशिवाय त्याचा अर्थ असा होतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पुर्व परवानगी एकदाच दिली जाते.

**हॅरल बोर्जिस :-**

ती आता घेत आहे आणि त्यांचे सहा महिने पुर्ण झाले आहे. परत त्यांना घेण्यासाठी पुर्वपरवानगी पाहिजे.

**मा. सभापती :-**

असे काही स्पेसिफिकली नमुद केलेले नाही. अशी परवानगी आपण स्थायी समितीच्या मार्फत अनेकवेळा घेऊ शकतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

असे कलमामध्ये आहे.

**मा. सभापती :-**

आहे ना, पण असे स्पेसिफिक नमुद नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुम्ही करा, तुम्हाला काय करायचे आहे ते.

**मा. सभापती :-**

आपण एक्स्टेंशन करत नाही. आपण त्यांना टेकनिकल ब्रेक दिला आहे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, माझे असे म्हणणे आपल्याकडे भु संपादन अधिकारी श्री. मोरे म्हणुन होते. त्यांनी बरेचसे जमिनी हस्तांतरित करण्यासाठी म्हणजे महापालिकेच्या ताब्यात येण्यासाठी बरेचसे प्रयत्न केले. परंतु, ते गेल्यानंतर बरीचशी कामे रेंगाळीत आणि प्रलंबित राहिलेली आहे. त्यांच्या जागेवर अजुनपर्यंत भुसंपादन अधिकारी आलेले नाहीत. त्यामुळे जी काही रेंगाळलेली कामे आहेत ती पुढे जाऊ शकत नाही. असा आमचा अनुभव आहे की, घोडबंदर येथील स्मशान भुमी आणि दफन भुमीसाठी त्यांनी प्रयत्न करुन तिथे डी. आर. आर. सर्व्हे वगैरे करुन पंरतु ते गेल्यानंतर त्याची पुढे काही कार्यवाही झालेली नाही. तर माझे असे म्हणणे आहे की, डॉक्टर साहेबांना जोपर्यंत पुढची वाढ द्यायची नसेल, त्याच्या जागी कोण नवीन येईपर्यंत त्यांना सहा महिने द्यावे व त्याच्यानंतर हवे असल्यास त्यांना मुदतवाढ देऊ नये.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी ह्यांनी ठराव मांडलेला आहे. परंतु, जसे सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस साहेबांनी सांगितले आपल्याला, आपण ह्या नियमानुसार श्री. माळी ह्यांना मुदतवाढ दिलेली आहे. ह्यांची देखील सेम कंडीशन आहे. त्या पद्धतीने आपण वाढ देत आहोत आणि आपल्याला उक्त अधिकार आहेत. आपण आपल्या अधिकाराचा वापर येथे करत आहोत आणि आपली संमती घेतल्याशिवाय आयुक्त साहेब अशी वाढ देऊ शकत नाही. म्हणुन आपल्या संमतीसाठी हे आलेले आहे. आपण आमच्या निर्दशनामध्ये आणलेले आहे आणि जे कायद्याने चुकीचे असेल तर त्याबरोबर तुम्हीही नाही आणि आम्हीही नाही, परंतु आपण तो कलम वाचला त्याच्यात असे स्पेसिफिक असे कुठे नमुद केलेले नाही. त्यामुळे उक्त परवानगी मंजुरी देऊ शकतो.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभापती साहेब, मी सांगितले की, त्याचे काय होणार? आपण दोघांकडे कामाचे वाटप करुन द्या.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स ह्यांनी मुद्दा उपस्थित केला की, डॉक्टर साहेबांची मुदतवाढीमध्ये चर्चा होत असताना दोन विषय आपल्यासमोर महत्त्वाचे आहे. आपल्याला भविष्यकाळामध्ये हे दोन विषय हातामध्ये घेऊन पुर्ण करायचे आहे. कदाचित तुम्हाला सर्वांना ज्ञात असेल ज्यावेळेला डॉक्टर साहेबांची नियुक्ती ह्या पदासाठी झाली. त्यावेळेला हा विषय डोळ्यासमोर ठेवुन त्यांची नियुक्ती त्यावेळेला केली गेली होती. कारण त्या पॉलिटिकल विषयामध्ये त्यांचे प्राविण्य होते. येथे दोन प्रकल्प आपल्याला पूर्ण करायचे आहेत. एक धावगी येथे पन्नास टन जैविक कचऱ्यावर खत निर्मितीचा आणि पेणकर पाडा येथे बायोगॅसवर विद्युत निर्मितीचा. सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स ह्यांनी एक विषय समोर आणला आहे. मला वाटते त्याच्यावर आपण गांभीर्याने विचार करावा आणि हे दोन प्रोजेक्ट पुर्ण करण्यासाठी एक अनुभवी अशा माणसाची आपल्याला आवश्यकता आहे आणि डॉक्टर साहेबांकडे हा प्रोजेक्ट पुर्ण करण्यासाठी चांगला अनुभव आहे. त्यामुळे ह्या विषयावर आपण गांभीर्याने विचार करावा.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य बोर्जिस साहेब हॉस्पीटलचा प्रश्नसुद्धा आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत, आणि आम्ही त्यांना अकार्यक्षम समजतो अशातला भाग नाही. परंतु, आपण काम करा आणि हा विषय मा. महासभेसमोर आणा नाहीतर आयुक्तांना त्यांच्या अखत्यारीमध्ये करु दे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीसजी आपण आपली बाजु मांडलेली आहे आणि सभागृहाने ही बाजु ऐकुन घेतली आहे. ह्याच्यावर मी आपल्याला रुलिंग दिलेले आहे की, ह्या पद्धतीने आपण त्यांना मंजुरी देऊ शकतो, असे मी रुलिंग दिलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आपण आमचा विरोध नोंदवुन घ्या.

**कैलासबेन जानी :-**

ह्यामुळे महापालिकेचे नुकसान होईल त्यची भरपाई कोण करणार? आपण जबाबदारी घेता का? अकाऊंटंट जबाबदारी घेतो का? त्यांना पगाराच्या माध्यमातुन पंधरा हजार रुपये जास्त जाणार आहेत. आपण बाहेरुन परमनन्ट डॉक्टर आणा.

**मा. सभापती :-**

मा. सहा. आयुक्त ह्यांनी आपल्याला त्याबाबत खुलासा केलेला आहे की, असा पत्रव्यवहार झाल्यानंतर त्या पद्धतीने ते रिक्त पद भरावे म्हणुन तसे प्रयत्नही सुरु आहेत. याबाबत मी सन्मा. सभागृहाला विनंती करेन की, आपण आपल्यापरीने लवकरांत लवकर हे पद भरता येईल. यासाठी शासनाला ज्या पद्धतीने ॲप्रोच करता येईल. त्या पद्धतीने ॲप्रोच व्हावे आणि हे पद आपण लवकर भरुन घ्यावे. जर उद्या हे रिक्त पद एक महिन्यानंतर भरले तर हा पुढचा विषय होऊ शकत नाही. आपण दोन महिन्यामध्ये भरु, तीन महिन्यामध्ये भरु. लवकरांत लवकर हे पद भरण्यासाठी सभागृहाने सहकार्य करावे असे मी विनंती करतो आणि आपण शासनाकडे ॲप्रोच होऊन ते करुन घेऊ.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आमचा विरोध नोंदवुन आपल्याला काय करायचे आहे ते करा.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, डॉक्टर बावस्कर ह्यांना मुदतवाढ देणे हे कायदेशीर आहे की, बेकायदेशीर आहे. तो प्रशासनाचा भाग आहे. बेकायदेशीर असेल तर आपण श्री. माळी साहेबांची जी मुदतवाढ केली तेही कॅन्सल होणार. पण मला असे वाटते की, प्रशासनाचा हा विषय आहे आणि प्रशासन ते बघुन घेणार. स्थायी समितीकडे डॉ. बावस्कर साहेबांचा जो विषय आणलेला आहे. कारण आपल्याला दोन प्रकल्प पुर्ण करायचे आहे आणि हॉस्पीटलचा विषय आहे तोही आपल्याला पुर्ण करायचा आहे. त्यासाठी आपण त्यांची नेमणुक केली होती आणि प्रश्न राहिला तो तीस हजाराचा तर जेव्हा तीस हजाराचा पगार मा. महासभेमध्ये पास करायला घेतले होते. तेव्हा मी स्वतःने त्याच्यावर ऑब्जेक्शन घेतला होता की, आपण येथे एकाही अधिकाऱ्याला एवढे पगार देत नाही तर ह्यांना आपण एवढा पगार कसा देतो. तरी आपण त्यांना मेन दोन मुद्द्यावर आणले होते आणि आपल्याला तो प्रोजेक्ट पुर्ण करायचा आहे. आपल्याकडे अल्टरनेट कोण नाही म्हणुन त्यांना मुदतवाढ द्यावीच लागेल आणि मला वाटते आरोग्य विभागामध्ये ८० च्या ८० नगरसेवकांची तक्रार नेहमी असते. त्याबद्दल मी धरणेवरही बसली होती की, आपल्याकडे जो रिपोर्ट सादर झाला होता. त्याच्यामध्ये आपण बघायला गेलो तर नुसते डॉ. बावस्कर साहेब, श्री. कांबळे सो., श्री. शिंदे सो., कोण एकटे जबाबदार नसतो. त्याला पॅनल असतो, खालुन वरपर्यंत जोपर्यंत खालुन वर मिळत नाही तोपर्यंत ती सिस्टम चांगली होत नाही. म्हणजे एकटे कोणाला दोषी ठेवु शकत नाही. तरीपण आरोग्य विभागाला मी धन्यवाद देते की, पहिल्यांदा आपली महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपरिषद होती. तरी आपल्या येथे पहिल्यांदा असे घडले की, कुठल्या ठेकेदाराचा ठेका रद्द झाला. त्याबद्दल मी धरणेवर बसली होती आणि आज मला संधी मिळाली म्हणुन मी आरोग्य विभागाचा धन्यवाद अदा करते की, एखाद्या ठेकेदाराचा ठेका रद्द केला त्यानंतरही आरोग्याचे जे चालले आहे, डॉ. बावस्कर सो., श्री. शिंदे सो., आणि श्री. कांबळे सो., तुम्ही तिघे जबाबदार आहात गटार साफ करायचे, नाले साफ करायचे अजूनही तसेच काम चालले आहे. पावसाळा आला आहे आणि नाले भरलेले आहेत, गटार अजूनही भरलेले आहे. आपल्याला हवे असल्यास आम्ही स्वतः तिथे तुम्हाला नेऊन दाखवतो, ही जबाबदारी आरोग्य विभागाची आहे. ठेका रद्द केला तर सर्व काही संपले असे नसते. ठेका रद्द केलेला असतानाही तो ठेकेदार बांधकाम विभागातर्फे ऑलरेडी अजून ठेका घेत आहे. त्या ठेकेदार आपण ब्लॅक लिस्टमध्ये टाकलेले आहे आणि तो बांधकाम विभागामध्ये टेंडर भरत आहे आणि त्याला ठेका मिळतही आहे. म्हणजे आपण जे काय केले ते चांगले केले आहे, त्याबद्दल

धन्यवाद द्यायचे की, एका बाजुला त्याची काही नुक्स काढायची ते लक्षात घ्या. बांधकाम विभागाने त्याला कुठलाही ठेका द्यायचा नाही पाहिजे. ब्लॅक लिस्ट म्हणजे महानगरपालिकेचा कुठलाही ठेका त्याला नाही मिळाला पाहिजे. आजच्या तारखेला जाऊन तो ठेकेदार टेंडर फॉर्म भरतो आणि त्यांना टेंडर मिळते. हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, एकता ठेकेदाराला ह्याच्यापुढे आरोग्याचा टेंडर असो, बांधकाम विभागाचा ठेका असो, कुठलाही ठेका मिळता कामा नये.

**मॉरस रॉड्रिक्स :-**

तसे मिळुच शकत नाही.  तो दुस-याच्या नावाने घेत असेल.

**गजानन भोईर :-**

त्याने एकताच्याच नावाने टेंडर भरले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

त्याला टेंडर मिळणार नाही, एकदा ब्लॅक लिस्टमध्ये नाव टाकल्यानंतर त्याला ठेका कुठुन मिळणार?

**मा. सभापती :-**

त्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले आहे किंवा नाही ह्याची माहिती द्यावी.

**हॅरल बोर्जिस :-**

त्या ठेकेदाराला अजुन ब्लॅक लिस्टमध्ये समावेशच केला नाही. त्याचा फक्त रद्द केलेला आहे.

**मा. सभापती :-**

याबाबत खुलासा करावा.

**डॉ. बावस्कर :-**

आरोग्य विभागाकडे जो साफसफाईचा करारनामा झालेला होता, त्यानुसार त्या ठेकेदाराला आरोग्य विभागामध्ये काळ्या यादीत टाकलेले आहे आणि जर महानगरपालिकेच्या सर्व विभागात काळ्या यादीत टाकायचे असेल तर आपण जर आज ठराव केला तर महानगरपालिकेच्या सर्व विभागामध्ये त्याने बांधकाम विभागामध्ये टेंडर भरले मला त्याची कल्पना नाही. आज मॅडम बोलल्या म्हणुन कल्पना आली, तसे मी आयुक्त साहेबांबरोबर बोलतो. आपण जर ठराव केला तर मी आयुक्तांच्या समोर नक्कीच हा ठराव मांडतो.

**रिटा शाह :-**

ठरावाची गरज नसते.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, मी एक सुचना करतो, एकतावाल्याने जरी दुस-याच्या लायसन्सवर जरी काम घेतले तर त्यालासुद्धा तुम्ही ब्लॅक लिस्टमध्ये ठेवा.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, बावस्कर साहेबांनी जे डिक्लअर केले की, आरोग्य विभागामधुन त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकले आहे. ह्याचा अर्थ महानगरपालिकेच्या कुठल्याही विभागामध्ये तो ब्लॅक लिस्टमध्ये गेला म्हणजे तो ऑलरेडी महानगरपालिकेतुन जायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

काळी यादी जेव्हा जाहिर केली असेल आणि काळ्या यादीमध्ये एखाद्या ठेकेदाराचे रजिस्ट्रेशन, नंबर आणि नाव आहे, ह्याला काळ्या यादीमध्ये समाविष्ट केल्यानंतर त्यांनी कोणत्याही प्रकारचे काम या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये घेऊ शकत नाही असे एकंदरीत आहे. आता फक्त त्या ठेकेदाराला काळ्या यादीत समाविष्ट केले की नाही केले ह्याचा खुलासा त्यांच्याकडे आपण मागितला.

**जोजफ घोन्सालवीस :-**

काळ्या यादीत टाकायचे असा ठराव करायला पाहिजे. ते ठराव मागतात. पण ह्याला ठराव करायची काय आवश्यकता आहे.

**गजानन भोईर :-**

डॉक्टर साहेब, एखाद्या अधिका-याने जर आरोग्य विभागामध्ये अफरातफर केली तर त्याला बांधकामामध्ये ट्रान्सफर करा. हे असे होईल. त्या ठेकेदाराला ह्याच्यापुढे महानगरपालिकेचा कुठलाही ठेका देऊ नये.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्याला ठराव काय करणार?  जे नियम आहे त्या नियमाने करा.

**प्रभात पाटील / रिटा शाह :-**

आपण त्याला महानगरपालिकेत काळ्या यादीत टाकावे, नुसते आरोग्य विभागाकरिता नाही.

**गजानन भोईर :-**

आरोग्यापुरते ते राहिले नव्हते. संपुर्ण महानगरपालिकेत सभापती साहेब, तशा सुचना सर्वांना द्या की, आपल्याला संपुर्ण महानगरपालिकेत कुठलेही टेंडर मिळाले नाही पाहिजे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आरोग्य विभागाने ह्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले आहे ना? का नुसते आरोग्य विभागामध्ये काळ्या यादीत टाकण्यांत आले असे लिहिले आहे?

**हॅरल बोर्जीस :-**

महानगरपालिकेच्या ठेक्यात जर तो ठेकेदार काळ्या यादीत गेला तर त्याच्यामध्ये आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग आले आणि त्याचे नांव काळ्या यादीत गेले म्हणजे तो महानगरपालिकेचे काम करण्यास असमर्थ आहे. त्यामुळे बांधकाम आणि आरोग्य असा विषय होत नाही.

**मा. सभापती :-**

याबाबत प्रशासनाकडून अशी माहिती आपण आम्हांला द्यावी. त्या पद्धतीने विषय पुढे घेऊन ठराव पारित करण्यांत येईल.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, याबाबत प्रशासन काय माहिती देणार? आपल्या ठरावामध्ये असे झाले होते, जो दोषी ठेकेदार असणार त्याचा ठेका आपण रद्द करुन काळ्या यादीत टाकणार, असा आपला ठराव झाला होता. त्याला आरोग्य विभागाने काळ्या यादीत टाकले. महानगरपालिकेतून बाहेर गेला असे होते.

**मा. सभापती :-**

त्या पद्धतीने एखाद्या ठेकेदाराचे नांव घेऊन त्याप्रमाणे स्पेसिफिक ठराव करायचे असेल तर त्यावेळीही मी तुम्हांला रुलिंग दिले होते की, अशा पद्धतीने काळ्या यादीमध्ये टाकायची पुर्तता केलेली असेल तशी माहिती सादर करावी. तो ठराव आपण मांडू शकतो.

**रिटा शाह :-**

ते बोलतात ना, ठराव केला आहे.

**मा. सभापती :-**

ठराव केला असेल तर प्रश्न येतच नाही. पण ठराव केला नसेल तर ठराव करावा लागेल.

**रिटा शाह :-**

त्यांनी केले आहे.

**मा. सभापती :-**

त्यांनी केले आहे असे बोलून चालणार नाही. आपल्याला त्यासाठी त्याचे नांव आणि त्याने केलेला पाठपुरावा, पत्रव्यवहार डिक्लरेशन केले ते त्यांनी सभागृहापुढे आणावे.

**रिटा शाह :-**

आपण ते रितसर आणा.

**गजानन भोईर :-**

ते रितसर आणून त्यांची नोटीस पेपरलाही द्या. नॅशनल पेपर द्या. ह्या नावाची व्यक्ती, त्याचे हे रजिस्टर नंबर आहे. त्याला काळ्या यादीत टाकण्यांत येत आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, तोपर्यंत माझी विनंती आहे. त्या ठेकेदाराला बांधकाम विभाग असे द्या किंवा दुसरे कोणतेही विभाग असू द्या. त्याला टेंडर द्यायचे नाही. तेवढे तर आपण करु शकतो ना?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण कसे करु शकणार? जोपर्यंत तो काळ्या लिस्टमध्ये येऊ शकत नाही तोपर्यंत आपण करु शकत नाही.

**रिटा शाह :-**

आरोग्य विभागामध्ये तो काळ्या यादीत आलेला आहे.

**मा. सभापती :-**

आपण ठराव केला म्हणजे तो काळ्या यादीत आला असे नाही, हे मी सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो. त्या पद्धतीने त्याची कायदेशीर पुर्तता झाली पाहिजे. सभेसमोर पुरावेही आले पाहिजे आणि

जेव्हा डॉक्युमेंट सभेसमोर आले तेव्हा आपण सांगू शकतो की, हा ठेकेदार काळ्या यादीत आला, तोपर्यंत काळ्या यादीत आले असे होत नाही.

**रिटा शाह :-**

डॉक्टर बावस्कर साहेबांनी उत्तर द्यावे की, त्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले आहे, ते पुरव्यासकट टाकले आहे की, तुमच्या मनाने टाकले आहे? कायदेशिर टाकले आहे की, बेकायदेशिर टाकले आहे?

**डॉ. बावस्कर :-**

जो करारनामा आरोग्य विभागाशी त्या ठेकेदाराचा झालेला होता किंवा जे करारनामे केलेले होते त्यामध्ये जर ठेकेदार मध्येच काम सोडून गेला किंवा महानगरपालिकेने त्याचे काम रद्द केले तर अशा ठेकेदाराला पुन्हा आरोग्य विभागात अशा पद्धतीचे काम देता येणार नाही, अशी अट त्या करारनाम्यामध्ये टाकलेली आहे आणि त्या ठेकेदाराला दिलेल्या पत्रामध्ये करारनाम्यातील ज्या अटीशर्ती आहेत त्याचा पुर्ण उल्लेख केलेला आहे की, त्यानुसार आपणावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. जर स्थायी समितीमध्ये आजच्या चर्चेनुसार आपल्याला पुर्ण महानगरपालिकेच्या विभागात जसे सन्मा. सदस्य श्री. भोईर साहेबांनी सांगितले तशा प्रकारची कार्यवाही करायची असेल तर आज दोन ओळींचा ठराव केला तर याबाबत मी आयुक्त साहेबांबरोबर बोलतो.

**मा. सभापती :-**

असा ठराव होऊ शकत नाही. आपण चुकीची माहिती देऊ नका. आपण असे ठराव प्रोसिडींगमध्ये करतो आणि त्या ठरावाला बेस राहत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

ठिक आहे. मी आयुक्त साहेबांबरोबर बोलतो. मग तशी कार्यवाही करु.

**प्रभात पाटील :-**

हा रितसर विषय येऊ द्या. येणाऱ्या सभेमध्ये विषयपत्रिकेवर लगेच विषय घ्या.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण पेपरमध्ये डिक्लअर अरा.

**डॉ. बावस्कर :-**

जी कायदेशिर कार्यवाही असेल त्याची पुर्तता करण्यांत येईल.

**गजानन भोईर :-**

स्थायी समितीमध्ये त्याचा निर्णय लागेपर्यंत जर त्याने ठेका घेतला तर सदरचा ठेका कॅन्सल करावा असेही त्याच्यात नमुद करावे. कारण ठेके निघतील त्यात तो घेईल.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सन्मा. सदस्य त्या ठेकेदारांचा ठेका कसा रद्द होईल. त्या ठेकेदाराला तशी वॉर्निंग द्यावी लागते. ठेका असाच रद्द होऊ शकत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, ही दुःखाची गोष्ट आहे की, आपण एका ठेकेदारासाठी भांडतो. तो ठेका घेतो आणि आपले करोडो रुपये घालवतो आणि आपण त्या ठेकेदाराला ठेवण्यासाठी भांडतो म्हणजे ही दुःखाची गोष्ट आहे. तो ठेकेदार राहिला किंवा न राहिला तर महानगरपालिकेला नुकसान होणार नाही. आपले नुकसान झालेले आहे आणि आपण आज त्या ठेकेदाराचाी बाजू घेऊन भांडतो.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण कोणाची बाजू घेऊन भांडत नाही. मला ए-वन किंवा एकता कोण आहे ते माहित नाही. मी आपली स्वच्छ बाजू सांगू इच्छितो. कुठलाही नागरिक असला तर त्याचा हक्क असतो भांडण्याचा.

**रिटा शाह :-**

त्याचे नांव ए-वन आहे पण काम झिरो वन आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब, डॉ. बी. एस्. बावस्कर ह्यांना नियुक्ती देण्याचा आजचा विषय होता. डॉ. बी. एस्. बावस्कर ह्यांना घनकचऱ्याचे जे दोन प्रकल्प आहेत, खत निर्मिती आणि विद्युत निर्मिती त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाना हे सर्व प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वित करण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी किंवा त्याची तपासणी करण्यासाठी हे काम अत्यावश्यक आहे. तरी वरील सर्व बाबींचा पाठपुरावा करुन डॉ. बी. एस्. बावस्कर यांना दि. २१/०५/२००५ पासून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(९) अन्वये सहा महिन्याच्या कालावधीसाठी मासिक रु. २९,४७७/- एवढ्या ठोक मानधनावर करारपद्धतीने नियुक्ती करण्यांस ही स्थायी समिती सभा........

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सन्मा. सभापती साहेब, माझे असे मत आहे की, एकाला सर्व काम न देता पार्टीशन करुन काम द्यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

घनकचऱ्याचे दोन्ही प्रकल्प आणि दवाखाना व आरोग्य उपकेंद्र ह्याच्या सर्व कामकाजाच्या देखरेखीकरिता डॉ. बावस्कर ह्यांना सहा महिन्यासाठी मुदतवाढ द्यावी आणि इतर जे आरोग्य खात्याची कामे असतील ती आपले इतर अधिकारी अहेत, जसे सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी ह्यांनी श्री. शिंदे व श्री. कांबळे ह्यांचे नांव घेतले. तर ती कामे इतर अधिकाऱ्यांमार्फत करुन घ्यावी असा सन्मा. सदस्य श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यानी ठराव मांडलेला आहे. त्याला मी अनुमोदन देत आहे.

**प्रकरण क्र. २२ :-**

डॉ. बी. एस. बावस्कर यांची विशेष कार्य. अधिकारी (आरोग्य) म्हणून सहा महिन्याची नियुक्ती करणे बाबत.

**ठराव क्र. २५ :-**

डॉ. बी. एस. बावस्कर हे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात विशेष कार्य अधिकारी म्हणून करार पद्धतीने कार्यरत आहेत. त्यांची मुदत दि. १८/०५/२००५ रोजी संपलेली आहे.

डॉ. बी. एस. बावस्कर यांचेवर महानगरपालिकेने सोपविलेली कामे वेळेत व समाधानकारकरित्या पार पडलेली आहेत. महानगरपालिा क्षेत्रात मौजे पाली व उत्तन येथील सर्व्हे नंबर अनुक्रमे ६५ व २५ या जागेत ५० टन जैविक विघटन होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन खत निर्मिती प्रकल्प सुरु करण्यासाठी मा. स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. तसेच पेणकरपाउा येथिल स्मशानीभूमीचे शेजारील जागेवर २५ टन जैविक विघटन होणाऱ्या घनकचत्यावर प्रक्रिया करुन बायोगॅस पासून विद्युत निर्मिती प्रकल्पास सुद्धा मा. स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे.

वरील दोन्ही प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वित करणे, त्यावर देखरेख ठेवणे व वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रात नव्याने एकूण ५ आरोग्य उपकेंद्रे पुढील १ ते २ महिन्यात सुरु करावयाची आहेत. महानगरपालिका क्षेत्रात शासकीय अनुदानातून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत प्रसुती व बालरुग्णालये आणि आरोग्य केंद्रे सुरु करण्यासाठी शासनाचे आरोग्य विभागास महानगरपालिकेकडून प्रस्ताव दिलेला आहे. यासाठी पाठपूरावा करून सदर प्रस्तावास शासनाची मंजूरी मिळविणे आवश्यक आहे.

महानगरपालिका रुग्णालयासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र भाईंदर येथिल जागा ताब्यात घेण्यासाठी महानगरपालिका प्रयत्न करीत आहे. मा. पालकमंत्री महोदयांनी सुद्धा सचिव पातळीवर एक बैठक घेऊन संबंधितांना प्रस्ताव सादर करण्यासाठी आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा ताब्यात घेणे व रुग्णालय उभारण्यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे.

आयुक्तांचा वरील गोषवारा पाहता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे शासनाकडून प्रतिनियुक्तीने अजूनपर्यंत मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदावर नियूक्ती न झाल्याने डॉ. बी. एस. बावस्कर यांना फक्त खालील कामे पार पाडण्याकरिता दि. २१/०५/२००५ पासून ६ महिन्यांकरिता रु. २९,४७७/- या मानधनावर करारनामा करुन नेमणूक करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

१. डॉ. बावस्कर यांनी आरोग्य विभागातील घनकचरा प्रकल्प विषय कामे स्वतंत्ररित्या पार पाडावीत.
२. प्राथमिक आरोगय केंद्र, भाईंदर हस्तांतरणाबाबत पाठपूरावा करणे.
३. महानगरपालिकेची आरोग्य उपकेंद्रावर देखरेख ठेवणे.
४. शासकीय अनुदानातून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत प्रसुती व बालरुग्णालये प्रस्तावाबाबत शासनाकडे पाठपूरावा करणे.
५. उपकेंद्राकरीता लागणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांचा शासनाकडे पाठविलेला पदनिर्मिती प्रस्तावाबाबत पाठपूरावा करो.

वरील कामा व्यतिरिक्त डॉ. बावस्कर यांनी कुठल्याही कामात हस्तक्षेप करु नये. आरोगय विभागातील दैनंदिन साफसफाई, औषध फवारणी, नाले सफाई, खोदाई, सर्व खरेदी कामे व इतर सर्व कामे श्री. राजकुमार कांबळे व श्री. संदीप शिंदे या आरोगय निरिक्षकांच्या देखरेख व नियंत्रणाखाली स्वतंत्ररित्या पार पाडण्यात यावीत. असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मॉरस रॉड्रीक्स. अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २३ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

स्थायी समिती सदस्य व वृक्षप्राधिकरण समितीचा विषय येथे आलेला आहे आणि वृक्षप्राधिकरण समितीबरोबर स्थायी समिती चांगले काम करते आणि स्थायी समितीने वेळोवेळी त्यांना मंजुऱ्याही दिल्या आहेत. याकरिता स्थायी समिती सदस्य आणि वृक्षप्राधिकरण समितीचे सदस्य, अधिकारी वर्ग ह्या सर्वांनी मिळून हा दौरा करावा अशा पद्धतीचा विषय आहे.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब, वृक्षप्राधिकरण समितीचा म्हैसूर, बेंगलोर अभ्यास दौरा आहे.

**प्र. सचिव :-**

सभापती साहेब, सुचना मांडू इच्छितो की, वृक्षप्राधिकरण समितीच्या सदस्यांचा कालावधी जुलैमध्ये संपत आहे. म्हणून हा दौरा जून महिन्यामध्येच आयोजित करावा लागेल.

**प्रभात पाटील :-**

हा दौरा आपल्याकडे मंजुरीसाठी आला आहे. म्हणजे ऑटोमॅटीकली स्थायी समितीचा त्याच्यामध्ये सहभाग आहे. वृक्षप्राधिकरणाचे मनपण असे आहे की, वृक्ष जसे सगळ्यांना सावली देतो तसे विशाल आहे. तर हा जो दौरा आहे त्याचयामध्ये स्थायी समितीच्या सदस्यांचा सहभाग घेऊन, अधिकाऱ्यांचा सहभाग घेऊन हा दौरा आखण्यांत यावा असा मी ठराव मांडत आहे.

**केशव घरत / सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २३ :-**

वृक्षप्राधिकरण स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांचा बंगलोर व म्हैसूर येथे अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. २६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समिती सदस्य व अधिकारी यांचा बेंगलोर व म्हैसूर येथे अभ्यास दौरा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र. २. दि. ६/५/२००५ ने मंजुरी दिलेली आहे.

बेंगलोर हे उद्यानाचे शहर म्हणून जगप्रसिद्ध असून ते पर्यावरणाचे दृष्टीने अतिशय चांगले शहर आहे. तसेच तेथे भारतीय उद्यान विद्या संशोधन केंद्र असून उद्यानांचा विकास कशाप्रकारे करावा याबाबत चांगली माहिती तेथे मिळू शकते. त्यामुळे बेंगलोर येथील अभ्यास दौऱ्याचा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानांचा विकास करण्यामध्ये चांगली मदत होईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समिती सदस्य, स्थायी समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचा माहे जुन अखेर पूर्व बेंगलोर व म्हैसूर येथे अभ्यास दौरा आयोजित करणेस व या दौऱ्याकरीता होणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २४ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, नाला बांधायचा आहे. दिल्ली दरबार हॉटेलपासून ते सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांच्या बंगल्यापर्यंत तो नाला बांधून घ्या. ते काम अतिमहत्वाचे आहे. बिल्डर भरणी करतो तेव्हा ते नाले बुजून जातात.

**मा. सभापती :-**

सिटी इंजिनिअर त्याचे काम काढले आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

त्याचे काम काढलेले नाही.

**मा. सभापती :-**

आपण प्रशासकीय व आर्थिक मंजूरी घ्या. बजेट बघून तो विषय विषयपत्रिकेवर घेऊन आर्थिक मंजुरीकरिता आणा. ते पुर्ण काम पन्नास लाखाच्या वर असेल तर टप्प्याने आणा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, जो तीन नंबरचा ठेका आहे. तो अठरा टक्क्याने जास्त का?

**दिपक खांबित :-**

तीन नंबरमध्ये चार टेंडर आहेत आणि जे चौथे टेंडर आहे, एकता कन्स्ट्रक्शनचचे, अंदाजपत्रकाने बिलोमध्येच आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

अंदाजपत्रक दराने म्हणजे काय?

**हॅरल बोर्जीस :-**

एस्टीमेटप्रमाणे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, स्मशानभूमी आणि दफनभूमीचा विषय घेतला होता. तो विषय सभेत घेतला नाही.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेत घेऊ.

**गजानन भोईर :-**

आपण विचारलेल्या प्रश्नाचे स्पष्टीकरण काय दिले?

**मा. सभापती :-**

जेवढ्या निविदा मंजुर आहेतत्या सर्व अंदाजपत्रक दराने आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

अनुक्रमांक १ ते ९ ही कामे अंदाजपत्रक दराने आहेत.

**मा. सभापती :-**

त्यात दोन नंबरचे काम बिलोने आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

अनुक्रमांक आठच्या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यांत येत असून सर्व कामाबाबत पुढील कार्यवाही प्रशासनाने पार पाडावी व सर्व कामे ठेकेदाराच्या वेळोवेळी येणाऱ्या देयकाच्या प्राधान्यास ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २४ :-**

निविदांना मंजुरी देणे. (बांधकाम विभाग)

**ठराव क्र. २७ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित रक्कम / दर |
|---|---|---|
| १. | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ६ मध्ये साधूराम हॉटेल जवळील नाला पूर्नबांधणी करुन स्लॅब टाकणे. (फेर निविदा) | रु. २६,१८,३३४/- |
| | १. मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| | २. मे. गजानन कन्स्ट्रक्शन | ७.००% जास्त दराने |
| | ३. मे. पारस कन्स्ट्रक्शन | ६.००% जास्त दराने |
| | ४. मे. एकता कन्स्ट्रक्शन | ६.००% जास्त दराने |
| २. | पांडूरंग वाडी (साईबाबा मंदीर रोड) रस्ता रुंदीकरण पुर्नपृष्ठीकरण करणे. (फेर निविदा) | रु. १७,४९,१७५/- |
| | १. मे. असफाल्ट इंडिया कार्पोरेशन | ८.००% जास्त दराने |
| | २. मे. रमेश ॲन्ड असोसिएटस | ७.००% जास्त दराने |
| | ३. मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन | ५.००% जास्त दराने |

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित रक्कम / दर |
|---|---|---|
| | ४. मे. छेडा रोड कन्स्ट्रक्शन | ०.१०% जास्त दराने |
| ३. | भाईंदर (पूर्व) खारीगाव शाळा इमारतीवर प्रभाग कार्यालय, वाचनालय, अभ्यासिका, इन्डोअर गेम करीता वाढीव मजले बांधणे. (फेर निविदा) | रु. ४७,१४,७५७/- |
| | १. मे. एम. सी. भोईर | १८.५०% जास्त दराने |
| | २. मे. ओम कन्स्ट्रक्शन | १८.००% जास्त दराने |
| | ३. मे. गजानन कन्स्ट्रक्शन | २१.००% जास्त दराने |
| | ४. मे. एकता कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| ४. | मिरा रोड स्मशानभूमी रोड लगत गटार बांधणे. (रिक्षा स्टॅन्ड पासून) (फेर निविदा) | रु. ४५,५१,१५५/- |
| | १. मे. गजानन कन्स्ट्रक्शन | ७.००% जास्त दराने |
| | २. मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| | ३. मे. एकता कन्स्ट्रक्शन | २.००% जास्त दराने |
| | ४. मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन | ६.००% जास्त दराने |
| ५. | भाईंदर (पू) कीरण नगर नाला दुरुस्ती करणे. (फेर निविदा) | रु. २३,५७,३७९/- |
| | १. मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| | २. मे. एकता कन्स्ट्रक्शन | २.००% जास्त दराने |
| | ३. मे. ओम कन्स्ट्रक्शन | ५.००% जास्त दराने |
| | ४. मे. गजानन कन्स्ट्रक्शन | ३.००% जास्त दराने |
| ६. | पातानबंदर मजीद दुकानापासून ते उत्तन स्मशानभूमी पर्यंत बंद गटार बांधणे (फेर निविदा) | रु. १९,३३,०५०/- |
| | १. मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन | ५.००% जास्त दराने |
| | २. मे. गजानन कन्स्ट्रक्शन | ३.००% जास्त दराने |
| | ३. मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| | ४. मे. आशापूरा कन्स्ट्रक्शन | ४.००% जास्त दराने |
| ७. | भाईंदर (प) गणेश देवलनगर ब्रीज ते वसई खाडी पर्यंत नाला बांधणे. (भाग - १) | रु. २३,५७,३७८/- |
| | १. मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन | ७.००% जास्त दराने |
| | २. मे. एम. डी. निमाणी | ५.००% जास्त दराने |
| | ३. मे. एच. एम. देसाई | ६.००% जास्त दराने |
| | ४. मे. पारस कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| ८. | जनता नगर, निलकमल हॉटेल ते बालवाडी पर्यंत उर्वरीत रस्ता बांधणे. | रु. १४,६६,४४३/- |
| | १. मे. रमेश ॲन्ड असोसिएट्स | ९.००% जास्त दराने |
| | २. मे. असफाल्ट इंडिया कार्पोरेशन लि | ४.००% जास्त दराने |
| | ३. मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन | ०.०१% जास्त दराने |
| ९. | छत्रपती शिवाजी महाराज मार्गातील हटकेश उद्योग नगर येथिल उर्वरीत रस्ता व नाला बांधणे | रु. २९,५२,३३२/- |
| | १. मे. गजानन कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| | २. मे. एकता कन्स्ट्रक्शन | ५.००% जास्त दराने |
| | ३. मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | ३.००% जास्त दराने |
| | ४. मे. अनायडा एन्टरप्रायजेस | ४.००% जास्त दराने |

अ.क्र. १ च्या कामाकरीता मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. २ च्या कामाकरिता मे. छेडा रोड कन्स्ट्रक्शन यांची ०.१०% कमी दराची निविदा, अ.क्र. ३ च्या कामाकरिता मे. एकता कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. ५ च्या कामकरीता मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. ६ च्या कामाकरीता मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. ७ च्या कामाकरीता मे. पास कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. ८ च्या कामाकरीता मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन यांची ०.१०% कमी दराची निविदा,

अ.क्र. ९ च्या कामाकरीता मे. गजानन कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा, मंजुर करण्यांत येत आहेत.

अ.क्र. ८ च्या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत असून सर्व कामाबाबत पुढील सर्व कार्यवाही प्रशासनाने पार पाडावी, तसेच सर्व कामी ठेकेदाराच्या वेळोवेळी येणाऱ्या देयकाच्या प्रदानास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २५ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, हे काम रेल्वेच्या अंडरमध्ये होईल का?

**दिपक खांबित :-**

ह्या कामाचे टेंडर आपण काढायचे, रेल्वेने काढायचे नाही. त्याचे कन्सीडर नेमायचे आणि कन्सीडरने एस्टीमेट काढून द्यायचे व टेंडर महानगरपालिकेतर्फे काढायचे.

**केशव घरत :-**

जो तांत्रिक सल्लागार आहे तो रेल्वेचाच आहे ना?

**दिपक खांबित :-**

होय, तो रेल्वेचाच आहे.

**मा. सभापती :-**

हे अधिक चांगले झाले. त्याबद्दल मी प्रशासनाला धन्यवाद देईन की, आपण तो पाठपुरावा केला आणि पाठपुरावा करुन त्यांचा कन्सलटंन्ट नेमून त्यांच्या थ्रु टेंडर काढायचे. कारण आपण त्यांना पैसे भरतो. मागचा फोटो ब्रीजचा आपला एवढा खराब अनुभव आहे. बांधकाम समितीची पहिली सभा झाली, नगरपालिका असतांना, तेव्हा आपण ठराव मांडला व तेव्हा कामाला सुरुवात झाली होती. त्याच्यानंतर आपण त्यांना पैसे भरले आणि पैसे भरल्यानंतर सुद्धा त्या पैशामध्ये पुन्हा वाढ झाली. म्हणजे त्यांनी आपल्याकडून पुन्हा अधिक पैसे मागितले आणि त्यामुळे त्या कामाला फार विलंब झाल आणि तो ब्रीज आपण ज्या पद्धतीने ठरवला, त्या कालावधीमध्ये जी रक्कम ठरवली, त्याच्यापेक्षा जास्त रक्कम देऊन आपल्याला विलंब लागला आणि त्याबद्दल नागरिकांच्या बऱ्याचशा तक्रारी ऐकाव्या लागल्या. त्यामुळे आपण आज या पद्धतीने त्या कन्सल्टंन्टमार्फत हा ठराव करुन जर पाठवला तर त्याचा ठेका काढण्याचे संपुर्ण पावर्स आपल्या अधिकारात राहणार आहेत व ते काम त्वरीत होऊन जाईल आणि आपल्यासमोर ह्या कामाची सुरुवात होईल व ह्या स्थायी समितीच्या कालावधीमध्ये ते काम सुरु होऊ शकेल अशी अपेक्षा निर्माण झालेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जी कलवट बांधणार आहात ते फाटकापासून ते मिरारोडपर्यंत असे कुठे कुठे?

**दिपक खांबित :-**

एकूण तीन कामे आहेत. पहिले सबवेला तरतुद आहे ते जेसलपार्कच्या येथे आहे ते करुन घेतोय व बाकीचे दोन कामे आहेत.

**गजानन भोईर :-**

मिरा रोड व भाईंदर रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वेखाली चार कलवट बांधणे आणि मिरा रोड येथे उड्डाणपुलाच्या येथे हे विषय चर्चेला आलेच नव्हते.

**दिपक खांबित :-**

हे विषय चर्चेला मा. महासभेत आलेले आहे.

**गजानन भोईर :-**

नाही. हे विषय आमच्यासमोर चर्चेला कधीच आले नव्हते.

**दिपक खांबित :-**

साहेब, हे दोन्ही मा. महासभेत मंजुर झालेले आहे.

**मा. सभापती :-**

मा. महासभेच्या चर्चेमध्ये कलवट बांधणे, पाईप लाईन काढणे हे विषय आलेले आहेत. आपल्याला मा. महासभेचे इतिवृत्तांत, ठराव दाखवतील. आपण जर आता हा विषय करुन घेतला तर पुढची पुर्तता करण्याच्या अगोदर आपल्याला हे काम देता येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण हे बांधणार कुठे? चार कलवट बांधायचे आहे. जागा कुठे आहे?

**दिपक खांबित :-**

भाईंदर फाटकाजवळ उघाडी आहे आणि डायरेक्ट जांभळीकडे चार ठिकाणी सर्व्हे केला. लोढापार्कचा जो रस्ता आहे, रेडिअन्स सोसायटी आहे.

**गजानन भोईर :-**

पण तिथे जागा आहे का?

**दिपक खांबित :-**

जागा आहे, रेल्वेचे आहे. त्याच्याखाली खोदुन क्रॉसिंग करायचे.

**कैलासबेन जानी :-**

पण मिरारोड ईस्टला जागा कुठे आहे.

**गजानन भोईर :-**

आपण आम्हांला कलवटचे स्वरुप सांगा? म्हणजे नक्की काय करणार?

**दिपक खांबित :-**

कलवट म्हणजे रेल्वेच्या खाली मोरी बांधायची.

**गजानन भोईर :-**

पाणी जायला की, दहिसरला जशी आहे तशी बांधणार.

**दिपक खांबित :-**

पाणी जायला बांधणार.

**कैलासबेन जानी :-**

मिरारोड पुर्वेला जागा कुठे आहे?

**गजानन भोईर :-**

मिरारोड पुर्वेला कुठेही जागा नाही.

**दिपक खांबित :-**

रेल्वेच्या खाली जी समांतर जागा आहे तिथे करायचे आहे.

**गजानन भोईर :-**

कशासाठी बांधायचे आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

गरज आहे का?

**दिपक खांबित :-**

मा. महासभेने त्याची मंजुरी दिलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण ती सॉल्ट डिपार्टमेंटची जागा आहे, तिथे कसे बांधणार?

**दिपक खांबित :-**

साहेब, हे लगेच आज होणार नाही. त्याचा सर्व्हे वगैरे करायचा आहे. त्याला बराच कालावधी जाणार आहे.

**गजानन भोईर :-**

जेसलपार्कच्या विषयाला पहिली मंजुरी द्या.

**रिटा शाह :-**

स्थायी समिती अध्यक्ष, आपण पहिले प्रशासनाचे धन्यवाद केले. पण मी आज पहिल्यांदा असे वाटते की, मी नेहमी विरोध करते. तरीही मी स्थायी समिती अध्यक्ष ह्यांना स्वतःहून धन्यवाद देते. कारण जेसल पार्कचा सबवे बनविण्यासाठी त्यांनी जी धडपड केली आहे आणि स्वतःहून लक्ष देऊन त्यांनी जे हे काम पुढे आणलेले आहे आणि ते आपले स्वप्न साकार झालेले आहे. त्याबाबत मी आपले अभिनंदन करत आहे आणि मला असे वाटते की, ते सर्वानुमते अभिनंदन असणार आहे. विरोधी पक्ष ही त्याबाबत आनंद व्यक्त करणार आणि दोन जे मिरा रोडचे काम ठेवले आहे त्यालाही मंजुरी द्या. कारण ते काम झाले तर चांगलेच आहे. मिरारोडचे उड्डाणपुलाचे सांगितले आहे तेही करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

जेसलपार्कचे एकच काम.

**रिटा शाह :-**

साहेब, विकासाचे काम आहे. ते काम होऊ द्या. मिरा रोड असू द्या किंवा भाईंदर असू द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सी.आर.झेड. मध्ये असे करणार? त्याचे आम्हांला स्पष्टीकरण दिले असते तर बरे झाले असते.

**रिटा शाह :-**

तिन्ही कामे घ्या.

**गजानन भोईर :-**

नाही, पहिले एकच काम घ्या, जेसलपार्कचे.

**दिपक खांबित :-**

एक नंबरचे काम करुन घेऊन आणि दोन व तीन नंबरचे काम बजेट मंजुर झाल्यानंतर करुन घेऊ.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. २५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर पुर्व व पश्चिम यांना जोडणारा सब वे बांधणे कामी रेल्वे प्रशासनाच्या शिफारसी नुसार मे. राईट्स लि. यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक करण्यांस मंजुरी देणे.

**ठराव क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खालील कामे करण्यास मा. महासभा दि. ०३/०८/२००४ ठराव क्र. २३ तसेच तत्कालिन सर्वसाधारण सभा यांनी मान्यता देण्यांत आलेल्या आहेत.

१) जेसलपार्क येथे भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा सब वे बांधणे.
२) मिरा रोड व भाईंदर रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वे खालील चार कल्वर्ट बांधणे.
३) मिरा रोड येथे उड्डाणपूल बांधणे.

वरील कामाबाबत रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार व पाठपूरावा केला असता रेल्वे प्रशासनाने मे. राईट्स या एजन्सीमार्फत कामे करुन घेण्याबाबत कळविलेले आहे. याबाबत मे. राईट्स यांच्याशी पत्रव्यवहार करुन बैठक घेतली असता त्यांनी वरील कामाकरीता खालील प्रमाणे मोबदल्यात काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. खाली नमुद केलेल्या दरामध्ये शासकीय नियमानूसार कपात कर मे. राईट्स यांना महानगरपालिकेकडून द्यावे लागणार आहेत.

१) जेसल पार्क येथे भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा सब वे बांधणे.

| | | |
|---|---|---|
| a) | Mobilisation Fee | Rs. 1.00 Lakh |
| b) | After completion detailed survey location of utility services other department/agencies fixing of alignment and its approaches and submission of survey drawing to MBMC | Rs. 1.00 Lakh |
| c) | Geotech Investing. | Rs. 1.60 Lakhs |
| d) | Preparation of Drawing, design, Estimate | Rs. 3.50 Lakhs |
| e) | On approval of General Agreement Drawing from Railway | Rs. 1.00 Lakh |
| f) | Submission of Estimation and Draft Tender to MBMC | Rs. 1.00 Lakh |
| g) | Supervision, Project Management | Rs. 30.00 Lakhs |
| | | **Rs. 39.10 Lakhs** |

२) मिरा रोड व भाईंदर रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वे खालील चार कल्वर्ट बांधणे.

| | | |
|---|---|---|
| a) | Mobilisation Fee | Rs. 2.00 Lakhs |
| b) | After completion detailed survey location of utility services other department/agencies fixing of alignment and its approaches and submission of survey drawing to MBMC | Rs. 4.00 Lakhs |
| c) | Geotech Investing. | Rs. 3.20 Lakhs |

| | | |
|---|---|---|
| d) | Preparation of Drawing, design, Estimate | Rs. 4.00 Lakhs |
| e) | On approval of General Agreement Drawing from Railway | Rs. 2.00 Lakhs |
| f) | Submission of Estimation and Draft Tender to MBMC | Rs. 2.00 Lakhs |
| g) | Supervision, Project Management | Rs. 60.00 Lakhs |
| | | **Rs. 77.20 Lakhs** |

३) मिरा रोड पूर्व व पश्चिम यांना जोडणारा उड्डाणपूल बांधणे.

| | | |
|---|---|---|
| a) | Mobilisation Fee | Rs. 2.00 Lakhs |
| b) | After completion detailed survey location of utility services other department/agencies fixing of alignment and its approaches and submission of survey drawing to MBMC | Rs. 1.00 Lakh |
| c) | Geotech Investing. | Rs. 4.80 Lakhs |
| d) | Preparation of Drawing, design, Estimate | Rs. 3.50 Lakhs |
| e) | On approval of General Agreement Drawing from Railway | Rs. 1.00 Lakh |
| f) | Submission of Estimation and Draft Tender to MBMC | Rs. 1.00 Lakh |
| g) | Supervision, Project Management | Rs. 35.00 Lakhs |
| | | **Rs. 48.30 Lakhs** |

वरील पैकी अ.क्र. १ जेसल पार्क येथे सब वे बांधणे कामाकरीता मे. महासभेने प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिलेली असून सन २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद उपलब्ध आहे. तरी जेसलपार्क येथे सब वे बांधणे कामाकरीता रेल्वे प्रशासनाने शिफारस केल्यानूसार मे. राईट्स यांनी नेमणूक करुन करारनामा करण्यास व आवश्यक ती सर्व कामे करुन घेण्यास व वेळोवेळी देयक प्रदान करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच उर्वरीत अ.क्र. २ व अ.क्र. ३ चे कामी सुद्धा अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन घेऊन मे. राईट्स यांची नेमणूक करण्याबाबत व आवश्यक ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मे. राईट्स यांच्या मागणी नूसार देय असलेला सर्व्हीस टॅक्स अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. रीटा शाह.** **अनुमोदन :- श्रीम. प्रभात पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २६ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, नं. २६ प्रभाकर सावळे आव्हाड ह्याने जास्त दराने निविदा भरलेल्या आहेत. त्यांना ठेका देण्याशिवाय अर्थ नाही. त्यांनी निविदा भरल्या आहेत आणि त्यांच्या समोर कोणीही नाही. हे असे तीनदा झाले आहे आणि आयुक्त साहेबांच्या केबिनमध्ये त्यांना ०४.०० वाजता बोलावले होते. त्यावेळेला लोक असतांनाही त्यांना त्यांना रिस्पॉन्स दिला नाही.

**मा. सभापती :-**

आव्हाडने निविदा भरलेली आहे.

**गजानन भोईर :-**

एकानेच निविदा भरलेली आहे त्याला ठेका देण्यांत यावे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याने आणखीन एक लाख रुपये वाढवून दिले आहेत.

**गजानन भोईर :-**

त्याला तो ठेका देण्यांत यावा.

(सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**विजय पाटील :-**

उत्तनला दोन लाख सतरा हजार रुपये फक्त अकरा महिन्यासाठी होते. भाईंदर पुर्व ६९ लाख ७५ हजार, भाईंदर पश्चिम ७७ लाख ९२ हजार आणि मुर्धे ते उत्तन ९ लाख १७ हजार रुपये ही प्रशासनाने केलेली अपेक्षित रक्कम आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याच्यामध्ये गेल्यावर्षी ४ लाख ४५ हजार होते.

**प्रभात पाटील :-**

गेल्यावर्षी मोर्वाचा बाजार लिलाव कितीला गेला होता?

**विजय पाटील :-**

५६ लाख रुपये.

**प्रभात पाटील :-**

पश्चिमेला कितीला गेला होता?

**विजय पाटील :-**

५६ लाख रुपये.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्या ठेक्याचे काय करणार? एवढा लॉस कोण भरुण देणार? सव्वा दोन आणि नऊ म्हणजे किती झाले?

**मा. सभापती :-**

बाजार लिलावाच्या अनेक वेळेला निविदा मागवल्या पण त्याला रिस्पॉन्स मिळाला नाही आणि आपण जो वसुलीचा विषय बोलता तर वसुलीमध्ये किती खर्च येऊ शकेल त्याचा खुलासा विजय पाटील ह्यांनी करावा.

**विजय पाटील :-**

उत्तनसाठी साधारणपणे तीन लाख रुपये एवढा प्रशासकीय खर्च येणार आहे. त्याच्याकरिता पाच शिपाई, एक क्लार्क आणि हा आस्थापनेचा जो खर्च आहे तो तीन लाखापर्यंतचा आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपल्याला हे स्वस्तात पडेल. नाहीतरी नऊ लाख रुपये अपेक्षित रक्कम आहे.

**मा. सभापती :-**

तेवढेच जर होत असेल तर आपल्याला स्टाफ आणून उपयोग काय?

**हॅरल बोर्जीस :-**

नऊ लाख रुपये वसुल करायला तीन लाख रुपये आपल्याला आणायला लागतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तरीही ते फायदेशिर आहे ना? सव्वा दोन लाखापेक्षा सहा लाख रुपये फायदेशिर आहे ना?

**विजय पाटील :-**

देकाराची रक्कम नऊ लाख सतरा हजार रुपये आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण अंदाज केला कसा? देकाराची रक्कम अपेक्षित आहे असे ठरवले नाही तर आपण त्यांच्याकडून अपेक्षा कशी करता की, नऊ लाख रुपये देकाराची रक्कम आहे.

**विजय पाटील :-**

आपण फिक्स केली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण फिक्स केली आहे, मग ते आपल्याला मिळायलाच पाहिजे असे आपले अंदाज आहेत.

**मा. सभापती :-**

उत्तनच्या ह्या ठेक्याला आपण सर्वांनी मागच्या सभेत मंजुरी दिलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साडे सात लाखाचा जर फरक येतो तर आपले स्थायी समितीचे अंदाज कुठे गेले? याचा अर्थ आपण कुठेतरी चुकतोय. नुसते बजेट वाढवतो. नाहीतर नगरपालिकेकडून वसुल करा.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्यात काहीतरी वाढ व्हायला नको का? अजिबात वाढ नाही.

**मा. सभापती :-**

आपण मागच्यावेळी या सदनानेच त्याला मान्यता दिली होती. आपण सर्व होता.

**गजानन भोईर :-**

ह्या ठेकेदारालच्या अगेन्स्ट कोणी नाही त्यामुळे आव्हाडला मंजुरी द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब ठराव मंजुर करावा.

**विजय पाटील :-**

प्रशासनाने गोषवारा जो दिलेला आहे तो स्पष्ट आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण त्या निविदाधारकाला परत बोलवा आणि त्याच्यात काय वाढ होत का ते बघा.

**विजय पाटील :-**

तीन वेळा झाले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तीन वेळा झाले आहे. आपण हा विषय संपवा आणि नगरपालिकेमार्फत वसुली करा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

वाटाघाटीला बोलवा.

**मा. सभापती :-**

वाटाघाटीला बोलावून घ्या.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, उत्तनचे वाटाघाटीला बोलावण्यासाठी जर पेंन्डींग ठेवत असाल तर तिन्ही पेंन्डींग ठेवा आणि पुढच्या सभेत विषय घ्या.

**मा. सभापती :-**

आपण एकाला वाटाघाटीसाठी बोलावले होते तेव्हा त्याने त्याच्यात वाढ करुन दिलेली आहे आणि जे दोन आहेत ते तुम्ही पुन्हा वाटाघाटीला बोलावून घ्या आणि तिघांची एकत्रित कार्यवाही करा.

**रिटा शाह :-**

तिघांना एकत्र बोलावून घ्या.

**गजानन भोईर :-**

परत कशाला? आपण महानगरपालिकेचे नुकसान करता कशाला? आधीच आपण त्याला तीन महिने वाढवून दिले.

(सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २६ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व), भाईंदर (प.) व मुर्धे ते उत्तन या विभागातील बाजार फी वसुलीच्या ठेक्याबाबत.

**ठराव क्र. २९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) व मुर्धे ते उत्तन या विभागातील ११ महिन्याच्या कालावधीकरिता बाजार फी वसुली कामी दि. १६/०४/२००५ च्या स्थानिक व राज्यस्तरिय वृत्तपत्रात जाहीरात देऊन सर्व इच्छुकांकडून देकाराच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यांच्या देकाराची रक्कम पुढीलप्रमाणे आहे. **<u>भाईंदर (पूर्व) करिता :-</u>** १) रु. ५८,६५,५००/-, २) रु. ५७,५६,०००/-, ३) रु. ५६,५०,०००/-, ४) रु. ५५,५५,००१/-, ५) रु. ५०,००,०००/- व ६) ४३,३३,३००/- (महानगरपालिका किमान देकाराची रक्कम रु. ७९,७५,०००/-) अशा देकाराचा सहा निविदा प्राप्त झाल्या. **<u>भाईंदर (पश्चिम) करिता :-</u>** १) रु. ५२,५०,५००/-, २) रु. ५२,००,०००/-, ३) रु. ५१,११,०००/-, ४) रु. ४८,५१,१११/-, ५) रु. ४२,२२,२००/- व ६) रु. ४०,००,०००/- (महानगरपालिका किमान देकाराची रक्कम रु. ७७,९२,०००/-) अशा देकाराच्या ६ निविदा प्राप्त झाल्या. **<u>मुर्धे ते उत्तन करिता :-</u>** १) रु. २,२५,०००/-, २) रु. २,१०,०००/- व ३) रु. १,९८,०००/- (महानगरपालिका किमान देकाराची रक्कम रु. ९,१७,०००/-) अशा देकाराच्या ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदांपैकी एकहि निविदा महानगरपालिकेच्या किमान देकाराएवढी किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेची नसल्याने तृतीय

फेर निविदा मागविण्याबाबतचा प्रस्ताव निर्णयाकरिता मा. स्थायी समितीच्या बैठकीसमोर ठेवले असता ठराव क्र. ६, दि. १८/०५/२००५ अन्वये भाईंदर (पुर्व) व भाईंदर (पश्चिम) या विभागातील निविदाधारकांना देकाराच्या रक्कमेबाबत चर्चा करुन वाटाघाटि करणेकरिता मा. आयुक्त सोा., यांच्या दालनात बोलवणे व मुर्धे ते उत्तन या विभागातील बाजार फी वसुलीचा ठेका प्राप्त निविदांपैकी श्रीमती लिलाबाई कलबाटे यांची रु. २,२५,०००/- इतक्या देकाराची निविदा मंजूर केली. मा. आयुक्त सोा., यानी भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) व मुर्धे ते उत्तन या विभागातील सर्व निविदाधारकांना देकाराच्या रक्कमेबाबत चर्चा करुन वाटाघाटि करणेकरिता दि. २७/०५/२००५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता बोलविले असता फक्त भाईंदर (पुर्व) येथील एक निविदाधारक श्री. प्रभाकर सावळीराम आव्हाड यांनी त्याच्या पुर्वीच्या देकाराच्या रक्कम रु. ५८,०५,५००/- मध्ये वाढ करुन ती रक्कम रु. ५९,००,५००/- इतकी असल्याची मा. आयुक्त सोा. यांना लेखी दिले. भाईंदर (पश्चिम) बाजार ठेकेदार यांनी बाजार फी वसुलीच्या देकार रक्कमेबाबत वाटाघाटि व चर्चा करणेस नकार दिला असल्याने या सर्व वस्तुस्थितीचा विचार करता भाईंदर (पुर्व) विभागाकरिता श्री. प्रभाकर सावळीराम आव्हाड यांनी मा. आयुक्त सोा., यांना सादर केलेली रु. ५९,००,५००/- रक्कमेची (भाईंदर (पूर्व) करिता) निविदा तसेच भाईंदर (पश्चिम) करिता आलेल्या ६ निविदाधारकामध्ये श्री. प्रभाकर सावळीराम आव्हाड यांच्या निविदेतील रक्कम जास्त असल्याने (रु. ५२,००,५००/-) त्यांना भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व) विभागाच्या बाजार फी वसुलीच्या कामाच्या ठेक्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर दोन्ही विभागाची मंजुरी ही १२ महिन्याकरिता राहणार आहे. तसेच उत्तन विभागातील बाजार ठेकेदार यांना मा. आयुक्त सोा. यांनी फेर चर्चेकरिता बोलावून देकाराच्या रक्कमेबाबत वाटाघाटि करुन या बाबत अंतिम निर्णय मा. आयुक्त सोा. यांनी घेणेस हि सभा मंजुरी देत आहे. तसेच माहे जून-२००५ करिता भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम) व मुर्धे ते उत्तन विभागातील बाजार फी वसुली करिता ठेकेदारांच्या मुतदवाढीसहि हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. गजानन लक्ष्मण भोईर.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकात भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २७ चे वाचन केले.)

**केशव घरत :-**

सभापती महोदय, आपल्याकडे सध्या जे कोणही उपहारगृह चालवत आहेत, याबाबत माझे आणि सर्व सदस्यांचे असे म्हणणे आहे की, जो आहार आपल्याला जेवण वगैरे मा. महासभेला चहा आणि नाश्ता जो दिला जातो ह्याचे पैसे महानगरपालिकेतर्फे योग्य प्रकारे दिले जातात. परंतु आपल्याला जे अन्न दिले जाते ते व्यवस्थित नसते असे माझे आणि सर्व सन्मा. सदस्यांचे मत आहे आणि वेळोवेळी मी तक्रारसुद्धा केलेली आहे. तर माझे असे म्हणणे आहे की, ह्या वेळेला त्यांचा ठेका बदलून दुसऱ्या ठेकेदाराला हा ठेका देण्यांत यावा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी फक्त आहाराच्या बाबतीमध्ये बोलले. जर आपण उपहारगृहाची वस्तुस्थिती बघितली तर त्या उपहारगृहामध्ये आपल्याला किती बालकामगार काम करतांना दिसतील, ही गोष्ट खरोखरच खेदजनक आहे. दहा-दहा, बारा-बारा वर्षांची मुले तिथे काम करत आहेत आणि आहाराच्या बाबतीमध्ये जी वस्तुस्थिती आहे ती त्यांनी कथन केली आहे. स्थायी समितीमध्ये आणि महासभेमध्ये तुम्ही-आम्ही जे खातोय त्याबाबत आम्ही सचिवांनाही बोललो आहे की, आपला जो भत्ता असेल तो आपण आम्हांला द्या. आम्ही आमचे दहा-पंधरा जणांचे जेवण बनवून आणू. त्याच्यावर त्यांनी काय कार्यवाही केली अशा प्रकारच्या ठेकेदाराचे ठेके आपण त्वरीत रद्द करायला पाहिजे. कारण ते निकृष्ठ दर्जाचे जेवण देत आहेत. ह्याच्यावर गांभिर्याने विचार करा. सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी जी सुचना मांडलेली आहे त्याचे देकार रद्द करावा आणि जो किमान देकार असेल त्याला ठेका द्यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

उमेश पुजारी कोण आहे?

**विजय पाटील :-**

निविदाधारक आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

दोन नंबरचे जे श्री. उमेश पुजारी ह्यांचे जे दहा हजार रुपयांचा देकार ठेवलेला आहे. तर दहा हजाराच्या ऐवजी दहा हजार पाचशे घेऊन श्री. उमेश पुजारी ह्यांना सदर ठेका द्यावा. त्याचे कारण असे की, संबंधित सर्व सन्मा. सदस्यांनी उपहारगृहातून ज्या पद्धतीचे जेवण दिले जाते व संबंधित ठेकेदाराबाबत तक्रारी सर्व सन्मा. लोकप्रतिनिधी ह्यांच्यामार्फत आलेल्या आहेत. ते लक्षात घेता सदर ठेकेदाराचा ठेका रद्द करुन श्री. उमेश पुजारी ह्यांना दहा हजार पाचशे एक रुपयाला देकार द्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**केशव घरत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २७ :-**

महानगरपालिका मुख्य कार्यालयातील तळमजल्यावरील उपहार गृहाची जागा भाड्याने देऊन उपहार गृह चालविणे कामी अभिकर्ता (एजंट) नेमणे बाबत.

**ठराव क्र. ३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कर्यालयातील तळ मजल्यावरील उपहार गृहाची जागा भाड्याने देऊन उपहार गृह तीन वर्षाच्या कालावधीकरिता चालविणे कामी अभिकर्ता (एजंट) नेमण्याकरिता प्रथम **''मुंबई सकाळ''**, **''वृत्तमानस''**, **''सूरज प्रकाश''** या दैनिकांच्या दि. ०९/०३/२००५ च्या अंकात नियमित जाहिरात देऊन सर्व इच्छुकांकडून सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविण्यांत आल्या होत्या. उपहार गृहाच्या भाड्याबाबत महानगरपालिकेने किमान देकाराची रक्कम रु. १४,५३०/- इतकी निश्चित केली होती. सदर निविदा जाहिरातीच्या अनुषंगाने विहित मुदतीत एकाहि इच्छुकांकडून निविदा फॉर्मची खरेदी न केल्याने मा. आयुक्त सो., यांच्या दि. २१/०३/२००५ च्या आदेशान्वये प्रथम फेर निविदा मागवण्यात आल्या.

प्रथम फेर निविदा जाहिरात **''मुंबई सकाळ''**, **''वृत्तमानस''**, **व ''सूरज प्रकाश''** या दैनिक वर्तमानपत्रांच्या दि. २२/०३/२००५ च्या अंकात प्रसिद्ध केली होती. यावेळी हि महानगरपालिकेने किमान देकारांची रक्कम रु. १४,५३०/- इतकीच ठरवली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने महानगरपालिकेस पाच इच्छुकांकडून निविदा प्राप्त झाल्या होत्या, मात्र यावेळी एकाहि निविदाधारकाच्या देकाराची रक्कम महानगरपालिकेने ठरविलेलया किमान देकाराच्या रक्कमेएवढी नसल्याने मा. आयुक्त सो., यांच्या दि. २८/०४/२००५ च्या आदेशान्वये ''द्वितीय फेर निविदा'' मागवण्यात आल्या.

''द्वितीय फेर निविदा'' जाहिरात **''वृत्तमानस''**, **''नवशक्ती''**, **''मुंबई सकाळ''**, **व ''सूरज प्रकाश''** या वृत्तपत्रांच्या दि. ०४/०५/२००५ च्या अंकात प्रसिद्ध केली होती. यावेळीहि महानगरपालिकेने किमान देकारांची रक्कम रु. १४,५३०/- इतकीच ठेवली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने महानगरपालिकेस एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा व त्यातील देकारांच्या रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | महानगरपालिकेने ठरवलेल्या किमान देकाराची रक्कम | निविदाधारकाचे नाव व पत्ता | निविदेतील नमुद केलेल्या देकांरांची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | रु. १४,५३०/- (अक्षरी रु. चौदा हजार पाचशे तीस मात्र) | श्री. नितीन व्ही. कदम १०२. भगवती अपार्टमेंट, तारा पायल कंपाऊंड, नवघर पोलिस चौकीच्या मागे, भाईंदर (पूर्व) | रु. ९,२५१/- (अक्षरी रु. नऊ हजार दोनशे एकावन्न मात्र) |
| २ | | श्री उमेश पुजारी, आय.ओ.बी. स्टॉफ कॅन्टीन, मेकर टॉवर्स-ई, पाचवा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५ | रु. १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) |
| ३ | | श्री. मंजूनाथ C/O गणेश कॅटरर्स, टि.सी.एस. स्टॉफ कॅन्टीन, मेकर टॉवर्स-ई, अकरावा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५ | रु. ९,५००/- (अक्षरी रु. नऊ हजार पाचशे मात्र) |

| अ.क्र. | महानगरपालिकेने ठरवलेल्या किमान देकाराची रक्कम | निविदाधारकाचे नाव व पत्ता | निविदेतील नमुद केलेल्या देकांरांची रक्कम |
|---|---|---|---|
| ४ | | सौ. स्वाती नितीन कदम<br>जी/८, साई करिश्मा एन्क्लेव्ह-बी, तारा पायल कंपाऊंड, नवघर पोलिस चौकीच्या मागे, भाईंदर (पूर्व) | रु. १०,०००/-<br>(अक्षरी रु. दहा हजार मात्र) |

अशा प्रकारे झालेल्या निविदांपैकी श्री. उमेश पुजारी व सौ. स्वाती नितिन कदम यांच्या निविदेतील देकाराची रक्कम समसमान (रु. १०,०००/-) असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने व आदेशानुसार सदर दोन्ही निविदा धारकांना जा.क्र. मनपा/कर/६५/२००५-२००६, दि. १९/०५/२००५ च्या पत्रान्वये दि. २६/०५/२००५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता मा. आयुक्त सो. यांच्या दालनात देकाराच्या रक्कमेबाबत चर्चा करुन वाटाघाटी करण्याकरिता बोलविले असता सौ. स्वाती नितिन कदम ह्या वेळेत उपस्थित होत्या व श्री. उमेश पुजारे हे सकाळी ११.४० वाजेपर्यंत उपस्थित नव्हते. दरम्यानच्या कालावधीत सौ. स्वाती नितिन कदम यांनी पत्र देऊन त्यांच्या पुर्वीच्या देकाऱ्याच्या रक्कमेत (रु. १०,०००/-) वाढ करुन ती रु. १०,५००/- इतक्या रक्कमेचे असल्याबाबत मा. आयुक्त सो., ह्यांना कळविले आहे.  सदर बाबत निर्णय घेणे कामी प्रस्तुत बाब हि मा. स्थायी समिती समोर ठेवण्याचे आदेश मा. आयुक्त सो. यांनी दिले.

सदर बाबत ही मा. स्थायी समितीच्या बैठकीसमोर निर्णयाकरिता ठेवली असता सद्य स्थितीत सौ. स्वाती नितिन कदम ह्या चालवित असलेल्या उपहारगृहातील खाद्य पदार्थाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे व या बाबत सभागृहातील सर्व सदस्यांनी अतिशय तीव्र स्वरुपात नाराजी प्रगट करुन त्यांना ठेका मंजुर करु नये असा निर्णय घेऊन, दुसरे निविदांधारक श्री. उमेश पुजारी, आय.ओ.बी. स्टाफ कॅंटीन, मेकर टॉवर-ई, पाचवा मजला, कफ परेड, मुंबई यांना रु. १०,५०१/- प्रती महिना इतक्या भाड्यावर तीन वर्षाच्या कालावधीकरिता महानगरपालिका मुख्य कार्यालय, भाईंदर (पश्चिम) येथील तळमजल्यावरील उपहारगृहाची जागा भाड्याने देणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.          अनुमोदन :- श्री. केशव रामभाऊ घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २८ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर गांव येथे ७ लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी, ३.५० लक्ष लिटर क्षमतेचा संप व पंपगृह बांधणे कामाच्या निविदेत मंजुरी देणे. (फेरसादर)

**ठराव क्र. ३१ :-**

वरील विषयास अनुसरुन घोडबंदर येथे ७.०० लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी, ३.५० लक्ष लिटर क्षमतेचा संम्प व पंपगृग बांधणेसाठी (निविदा रक्कम रुपये ५६,२९,०८३/-) बी-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा मागविणेत आल्या होत्या.  सदर कामाकरिता तीन निविदाकारांनी देकार दिले असून सर्वात कमी देकार मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांनी (२७.००% जादा दराने) दिला आहे. याबाबत या विभागने मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांनी दिलेला २७.००% जादा देकाराचे दर विश्लेषण केले असता १९.२३% जादा दराने दर निश्चित होत आहे.  याबाबत मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲण्ड सर्व्हिसेस यांनी सदरचे काम १९.२३% जादा दराने करणेस तयार असल्याचे लेखी कळविले आहे.

वरील उपांगाच्या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार केले आहे.  सदरचे दर जाने. २००४ पासून आमलात आले आहेत.  परंतु

बाजारभावातील सिमेंट व स्टीलचे प्रचलित दर व जिल्हा दरसूचीमधील दर यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सुद्धा टाक्यांच्या कामासाठी २०% पर्यंत जास्त दराने निविदा प्राप्त झाल्या होत्या म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने एप्रिल २००५ मध्ये चालू दरसूचीमध्ये फक्त टाक्यांच्या कामासाठी व इतर समकक्ष उपांगासाठी नवीन सुधारीत दर निश्चित करुन त्याप्रमाणे जिल्हा दरसूचिमध्ये सुधारीत (वाढीव) दर समाविष्ठ केले आहेत. त्यानुसार नवीन सुधारीत व इतर तांत्रिक बाबींचा दर विश्लेषणात समावेश केल्यास १९.२३% जास्तीच्या दराची निविदा नवीन दरसीचीनूसार **'अंदाजित दराने'** निश्चित होत आहे.

सदरची निविदा पुन्हा मागविल्यास बाजारातील सिमेंट व स्टीलच्या दरानुसार १९.२३% जादा दराच्या निविदेपेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही व तसेच फेरनिविदा काढल्यास पुढील कार्यवाहीसाठी अजून दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागणार आहे. सध्या घोडबंदर येथील जुनी पाण्याची टाकी भरणे बंद केले असल्याने नागरीकांना सध्या बायपासद्वारे पाणी पुरवठा चालू असल्याने नागरीकांना कमी दाबाने पाणी होत आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता शासनाकडील नव्याने लागू करण्यात आलेले व्हॅट व इतर कर वाढले असल्याने सदर निविदा स्विकृतीस (निविदा रक्कमेच्या १९.२३% जादा दरास) मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २९ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

